**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग — अपीलकर्ता
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे - ४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वन संरक्षक,
वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ००४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपवन संरक्षक,
वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०१/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/६/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे.

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल, वन विभाग,
सेनापती बापट रोड, पुणे श्री. सतीश विष्णुपंत कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - वाकड (पुणे) येथील चाणक्य एज्युकेशन इन्स्टिटयूट, या संस्थेने बेकायदेशीररीत्या प्राणी पाळले होते. त्याबाबतची माहिती मुदतीत मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही. म्हणून आयोगाकडे अपील केले. तेव्हा प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या सूचनेचे पत्र व सुनावणीस मी गैरहजर असल्याचे नमूद करणारे पत्र अशी दोन्ही पत्रे एकाच दिवशी मिळाली. तसेच अशा प्रकारची संस्था नसल्याचेही नंतर कळविण्यात आले. संस्था अस्तित्वात असूनही असे उत्तर देऊन माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी याना शास्ती व्हावी.

<u>जन माहिती अधिकारी</u>- श्री. पुंडे यांचा दि. १.८.२००९ ही तारीख असलेला मूळ अर्ज दि. ८.९.२००९ रोजी प्राप्त झाला. माहिती वन्यप्राणी कक्षाकडील असल्यामुळे दि. १६.९.२००९ रोजी अर्ज त्यांच्याकडे वर्ग करुन माहिती देण्याच्या सूचना दिल्या. वन्यप्राणी कक्षाने माहिती निरंक असल्याचे कळविल्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा व पौड यांच्याकडून माहिती मागविली. श्री. पुंडे प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित न राहिल्यामुळे दि.३०.१०.२००९ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा वनसंरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. बी.एन.कदम यानी माहिती पाठविली.

श्री. पुंडे याना सुनावणीची सूचना पाठविल्याची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत, संबंधित कार्यालयांकडून माहिती देण्यास विलंब झाला असल्यास त्यांचा खुलासा, तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व विलंबाबाबतचा त्यांचा खुलासा तीन दिवसांत आयोगाला सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. पुंडे याना सुनावणीसाठी पाठविलेल्या पत्राच्या जावक बारनीशीतील नोंदीची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा लेखापाल , वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. सतीश विष्णुपंत कुलकर्णी यानी दि. २३.६.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा वनसंरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. बी.एन.कदम यानी दि. २५.६.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. 'श्री. पुंडे याचा दि. १.८.२००९ चा अर्ज माहिती अधिकार कक्षास दि. १५.९.२००९ रोजी प्राप्त' झाल्याचे त्यानी म्हटले आहे. मात्र विद्यमान जन माहिती अधिकारी तथा

लेखापाल , वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. सतीश विष्णुपंत कुलकर्णी यानी दि. २१.६.२०१० च्या पत्रान्वये सादर केलेल्या लेखी निवेदनात हा अर्ज दि. ८.९.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. 'माहिती देण्याबाबतच्या सूचनांसह हा अर्ज दि. १६.९.२००९ च्या पत्रान्वये वन्यप्राणी कक्षाकडे वर्ग करण्यात आला. दरम्यान श्री. पुंडे यानी प्रथम अपील दाखल केल्यानंतर दि. २९.२.२००९ च्या पत्रान्वये वन्यप्राणी कक्षास माहिती देण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात आल्या. त्यानंतर वन्यप्राणी कक्षातील लिपिका याना समक्ष विचारणा केली असता माहिती निरंक असल्याचे त्यानी तोंडी सांगितले व तसे लेखी कळविण्याच्या सूचना दिल्यानंतर त्यानी माहिती अधिकार कक्षातील नस्तीवरच तसे लिहून दिले. वन परिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांच्या कार्यक्षेत्रात अशी माहिती आहे का, हे जाणून घेण्यासाठी दि. १२.१०.२००९ च्या पत्रान्वये त्याना विचारणा केली. या प्रकरणी वन परिक्षेत्र अधिकारी, पौड यांच्याकडे चौकशी करण्याबाबतचे पत्र त्यानी दि. २८.१०.२००९ रोजी दिले. दि. २९.९.२०१० रोजी प्रथम अपिलाची सुनावणी नियोजित असल्यामुळे वन परिक्षेत्र अधिकारी, पौड याना दूरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यानीही माहिती निरंक असल्याचे सांगितले. श्री. पुंडे सुनावणीला उपस्थित राहिले नसल्यामुळे दि. ३०.१०.२००९ रोजी माहितीबाबत त्याना कळविले',असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा वनसंरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. बी.एन.कदम यानी खुलाशात नमूद केले आहे व 'काही शासकीय अडचणीस्तव अपीलकर्त्यांना माहिती उशिरा मिळाली आहे', असे म्हटले आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीची दि. २९.२.२००९ ही चुकीची तारीख त्यात नमूद केली असून प्रत्यक्षात ती दि.२९.१०.२००९ असणे आवश्यक होते.

विद्यमान अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्या लेखी निवेदनामध्ये प्रथम अपिलाच्या सुनावणीची तारीख दि. २९.१०.२००९ हीच नमूद केली आहे. तसेच श्री. पुंडे यानी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाची प्रत प्राप्त झाल्यानंतर पुन्हा एकदा माहिती निरंक असल्याचे त्याना कळविले, असेही त्यांनी म्हटले आहे.

उभय बाजूंची निवेदने व वरील खुलासासह सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत तत्परतेने कार्यवाही झालेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (३) (दोन) मधील तरतुदीनुसार दि. ८.९.२००९ चा अर्ज ५ दिवसांत अन्य विभागाकडे वर्ग करणे आवश्यक असताना तो दि. १६.९.२००९ रोजी वन्यप्राणी कक्षाकडे वर्ग केल्याचे

दिसून येते. वन्यप्राणी कक्षाने स्मरणपत्र मिळूनही त्याबाबत तत्परतेने कार्यवाही केली नाही. वन परिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा व पौड याना त्यानंतर विचारणा करण्यात आली व त्यानी १५ दिवसांत उत्तर दिले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा वनसंरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. बी.एन.कदम यानी अपिलकर्त्यांस विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही. मात्र त्यानी माहिती-मागणीचा अर्ज वर्ग करण्याची कार्यवाही केली. परंतु वन्यप्राणी कक्षाने तत्परतेने कार्यवाही न केल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देण्यास २३ दिवस विलंब झाला आहे. हे लक्षात घेता संबंधितांना शास्ती करण्याची अपीलकर्त्याची मागणी रास्त ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती-मागणीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३)(दोन) नुसार ५ दिवसांच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा वनसंरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. बी.एन.कदम यानी संबंधितांकडे वर्ग केला नाही व अपीलकर्त्यास उत्तर दिले नाही. त्याबद्दल त्याना रु. १०००/- शास्ती लावण्यात येत असून शास्तीची रक्कम ही त्यांच्या माहे मे- २०११ च्या जून २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून एकाच हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा वन संरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे यानी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. माहिती-मागणीच्या अर्जावर वन्यप्राणी कक्षाने तत्परतेने कार्यवाही केली नाही. स्मरणपत्रानंतरही रीतसर उत्तर दिले नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही होऊन अपीलकर्त्यास उत्तर दिले जाण्यास २३ दिवस विलंब झाला. म्हणून वन्यप्राणी कक्षाला २३ दिवसांच्या विलंबाबद्दल (२३ x २५०) ५,७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा वन संरक्षक, वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे यानी वन्यप्राणी कक्षातील संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून मे २०११ च्या जून २०११ मध्ये देय

असलेल्या वेतनातून शास्तीची रक्कम वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विनोद अशोक मोरे
मु.पो.अंजनगांव, **अपीलकर्ता**
ता.बारामती, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत कांबळेश्वर,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४५९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**<br>पंचायत समिती बारामती,<br>ता.बारामती, जि.पुणे श्री.विनायक जगन्नाथ गुळवे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत कांबळेश्वर अंतर्गत दलितवस्ती सुधार योजना, यशवंत ग्रामसमृध्दी योजना, १५ टक्के मागासवर्गीय निधी इ. योजना मधून केलेल्या कामासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विनोद अशोक मोरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी दिलेल्या माहिती अर्जानुसार मला परिपूर्ण माहिती समक्ष मिळाली आहे. सदरच्या माहितीने माझे समाधान झाले असल्याने माझी काही तक्रार नाही, माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री.मोरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंदन किसनराव सोंडेकर
मौजे पिंपळे जगताप, पो.करंदी, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंदन किसनराव सोंडेकर
मौजे पिंपळे जगताप, पो.करंदी, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे प्रतिनिधी श्रीमती सीमा होळकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती सीमा होळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. परंतु समाधानकारक माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - श्री.सोंडेकर यांचा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार, शिरुर यांच्याकडे पाठविल्याचे त्यांना विहित मुदतीत कळविले. कागदपत्रे पहावयाची असल्यास येण्याबाबतही कळविले.

तहसीलदार, शिरुर यानी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तहसीलदार, शिरुर यांनी दि. ९.२.२०१० च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, मावळ यांच्याकडे अहवाल सादर केला असल्याचे निवासी नायब तहसीलदार, शिरुर यानी अपीलकर्त्यास दि.१४/२०.१.२०११ च्या पत्रान्वये कळविल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि.२५.१.२०११ च्या पत्रान्वये या पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राहुल शिवाजी भड
मु.पो.गौडगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (संवसू), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी शहर उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राहुल शिवाजी भड
मु.पो.गौडगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी शहर उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर
विद्यमान-श्री.एस.के.दरबस्तवार, तत्कालीन-श्री.आर.डी.गाढवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : ग्रामीण व शहरी भागातील ट्रान्सफॉर्मरबाबतची अचूक माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही. शहरी भागातील ट्रान्सफॉर्मर २४ तासात व ग्रामीण भागातील ट्रान्सफॉर्मर ४८ तासात दुरूस्त व्हावा, तसे न झाल्यास संबंधितांना नुकसानभरपाई मिळावी, अशी कायद्यात तरतूद आहे. त्यानुसार नुकसानभरपाई मिळावी.

जन माहिती अधिकारी : श्री.भड यांचा अर्ज दि.५.५.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.२८.५.२०१० च्या पत्रान्वये त्याना उत्तर देण्यात आले. सन २००० ते एप्रिल २०१० या कालावधीतील माहिती त्यानी मागितली होती. संपूर्ण अभिलेख शोधून संकलित करून ती निःशुल्क दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी विस्तृत व सरसकट स्वरूपात माहितीची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी शहर उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर यानी संकलित स्वरूपात विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तथापि अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास सर्व संबंधित अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन एक आठवड्यात माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :-२५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश हिंदूराव देसाई
२०३३, 'सी वॉर्ड', सोमवार पेठ, कोल्हापूर-४१६००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री.नेत्रदिप शंकरराव सरनोबत (वि.का.क्र.४), श्री.शंकर कृष्णा माने(वि.का.क्र.२), श्री.रमेश कृष्णकांत मस्कर (वि.का.क्र.३), श्री.महादेव मारूती निमोणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रमेश हिंदूराव देसाई यानी बेकायदेशीर गुंठेवारी रद्द करण्याच्या महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशासंबंधातील माहिती वृत्तपत्रातील बातमीच्या आधारे मागितली होती. विस्तृत स्वरुपाची ही माहिती असून वॉर्डनिहाय अभिलेख उपलब्ध आहेत. त्यांचे अवलोकन करुन आवश्यक असलेली माहिती घ्यावी, असे कळविले. दि.११.१.२०१० च्या त्यांच्या अर्जाला दि.८.२.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले होते. पुनश्च पत्रादद्वारेही तसे कळविले. काही माहिती अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार देऊ केली असता अपीलकर्त्यानी घेण्यास नकार दिला. नंतर ही माहिती विनामूल्य देऊ केली होती. त्यानी ती न स्वीकारल्यामुळे दि.२७.३.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. कोणतेही अभिलेख त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.नेत्रदिप शंकरराव सरनोबत (वि.का.क्र.४), श्री.शंकर कृष्णा माने(वि.का.क्र.२), श्री.रमेश कृष्णकांत मस्कर (वि.का.क्र.३), श्री.महादेव मारूती निमोणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (I), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय रामचंद्र देसाई
संभाजीनगर, नांदणी रोड, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जुने डी.एस.पी.कार्यालय,
टाऊन हॉलचे पाठीमागे, कोल्हापूर ४१० ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय रामचंद्र देसाई
संभाजीनगर, नांदणी रोड, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जुने डी.एस.पी.कार्यालय,
टाऊन हॉलचे पाठीमागे, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.अलगौडर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.रणजित रघुनाथराव देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मोजणी रजिस्टरमधील जंगल गुणाकार बुकाच्या चुकीच्या व बेकायदेशीर नकला जन माहिती अधिकारी यांनी दिल्या. अर्जाला १५ महिने उलटूनही योग्य माहिती दिली जात नाही, अशी लेखी व तोंडी तक्रार अपीलकर्ता श्री.विजय रामचंद्र देसाई यानी केली.

अपीलकर्ता श्री.विजय रामचंद्र देसाई यानी दोन अर्जांद्वारे माहिती मागितली होती. एका मोजणी प्रकरणातील सन १९९६ चे गुणाकार बुक उपलब्ध होत नव्हते. ते वगळता सर्व माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यानी विहित मुदतीत दिली. श्री.देसाई यानी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जुने डी.एस.पी.कार्यालय, टाऊन हॉलचे पाठीमागे, कोल्हापूर यांच्याकडे प्रथम अपील केले. 'संबंधित गुणाकार बुकाचा कसून शोध घ्यावा व आढळ न झाल्यास जबाबदारी कायम करुन संबंधितांवर सेवानियमांतर्गत कारवाई करावी,' असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जुने डी.एस.पी.कार्यालय, टाऊन हॉलचे पाठीमागे, कोल्हापूर यांनी दिले. त्यानुसार शोध घेतला असता अन्य गावाच्या नस्तीत संबंधित गुणाकार बुके आदि कागदपत्रे मिळाली. त्यातील श्री.देसाई याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या नकला दि. १८.५.२०१० रोजी नि:शुल्क पुरविल्या, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.रणजित रघुनाथराव देशमुख यानी जावक बारनिशीतील नोंदींच्या व पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वामन नारायण दिक्षित
कल्याण अपार्टमेंट, सुधाकरनगर, वाय.पी.पोवार नगरजवळ, मेनरोड, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, महावितरण महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, मंडल कार्यालय, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महावितरण महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, मंडल कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वामन नारायण दिक्षित
कल्याण अपार्टमेंट, सुधाकरनगर, वाय.पी.पोवार नगरजवळ, मेनरोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मंडल कार्यालय, कोल्हापूर श्री.रमेश पुंजाजी घोलप

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मंडल कार्यालय, कोल्हापूर श्री.प्रदीप तात्यासाहेब आडके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वरिष्ठांनी नियमानुसार राजीनामा न मंजूर करता अडीच महिने प्रलंबित ठेवला. ग्रॅच्युईटीची रक्कम विलंबाने दिली व त्यावरील व्याज दिले नाही. तसेच ग्रॅच्युईटीमधून ३५ हजार रुपये कापून घेतले. त्याबद्दल दिलेली माहिती चुकीची, अपुरी व माझ्यावरच आरोप करणारी आहे.

जन माहिती अधिकारी - माहिती विस्तृत प्रमाणात होती. तसेच कारणे, खुलासा, अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा होती. तरीही जिल्हा कार्यालयाकडून माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्ता स्वतः हेडक्लार्क होते. त्यांचे आक्षेप प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे असून वेळोवेळी त्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांची सर्व आर्थिक देणी पूर्ण केलेली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच स्पष्टीकरण, खुलासा अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा या अधिनियमांतर्गत करता येत नाही .

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.गोरक्ष गंगाधर बोरकर
दिप हाईटस सह.गृहरचना संस्था मर्यादित, फ्लॅट नं.१८, दुसरा मजला,
कॅनरा बँकेच्या वर, रामवाडी, पुणे-नगर रोड, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथाअपर चिटणीस (कुळकायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.गोरक्ष गंगाधर बोरकर
दिप हाईटस सह.गृहरचना संस्था मर्यादित, फ्लॅट नं.१८, दुसरा मजला,
कॅनरा बँकेच्या वर, रामवाडी, पुणे-नगर रोड, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा अपर चिटणीस (कुळकायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती अमिता तळेकर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी याaनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - शिरुर तालुक्यातील महार वतन जमिनीच्या विक्री संदर्भात अधिकाऱ्यांनी कायद्यातील तरतुदींशी विसंगत स्वरुपाचे अहवाल विभागीय आयुक्तांना सादर केले व भरावयाच्या नजराणा रकमेबाबत लोकांची व शासनाची फसवणूक केली. या अनुषंगाने तत्कालीन रजा राखीव उपजिल्हाधिकारी श्री.अविनाश हदगल हे कूळ कायदा शाखेत रुजू झाल्यापासूनची माहिती मागितली होती. परंतु ती दिली गेली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - माहिती नाकारलेली नाही. शुल्क भरुन अभिलेखांचे अवलोकन करुन माहिती घ्यावी, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस (कुळकायदा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यानी कळविले व त्यामुळे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यानी अपील फेटाळले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असली तरी त्यानी उपस्थित केलेला विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा आहे. अशी माहिती नागरिकांना दिली जाणे आवश्यक आहे. म्हणून या संदर्भातील सर्व अभिलेख अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती नि:शुल्क पुरवाव्या. जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यानी १० दिवसांत ही कार्यवाही पूर्ण करावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस (कुळकायदा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

यानी दि.१०.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रशांत जयवंत जोशी
१२०४/१०, आपटे रोड, पुणे -४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता (क), पुणे परिमंडळ यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत,
पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे-११ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (क), पुणे परिमंडळ
यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत,
पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रशांत जयवंत जोशी
१२०४/१०, आपटे रोड, पुणे -४

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता (क), पुणे परिमंडळ यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे
प्रतिनिधी अभय रामदास चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (क), पुणे परिमंडळ
यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत,
पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे श्री.आत्माराम बाबूराव खांडेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - 'मणीकांचन'बंगला या मिळकतीवरील वीज जोडणीच्या संदर्भात मागितलेली माहिती अपुरी दिली जात असून संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले आहे. वीज जोडणीच्या संदर्भात संबंधित ग्राहकाने सादर केलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध होणे आवश्यक आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> - श्री. दोशी यांच्या दि. २१.५.२००९ च्या अर्जात ग्राहक क्रमांक आदि तपशील दिला नसल्यामुळे दि.२६.५.२००९ च्या पत्रान्वये त्याबाबत विचारणा केली. त्यानी दि.१२.६.२००९ रोजी नव्याने अर्ज सादर केला. दि. १५.६.२००९ रोजी तो जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, डेक्कन जिमखाना उपविभाग, पुणे यांच्याकडे वर्ग केला. सन १९७९ ते २००० या काळातील कागदपत्रांची मागणी केली असल्यामुळे शोध घेऊन उत्तर देण्यास विलंब झाला. माहिती निःशुल्क दिली. सन २००२ पासूनची माहिती उपलब्ध असून त्यापूर्वीची कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तसे श्री.दोशी याना कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (क), पुणे परिमंडळ यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (क), पुणे परिमंडळ यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रशासकीय

इमारत, पहिला मजला, रास्ता पेठ, पुणे यानी अभिलेखांचे अवलोकन करु द्यावे व अपीलकर्त्यानी लेखी मागणी केल्यास त्यानुसार कागदपत्रांच्या ५०पृष्ठांपर्यंतच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय लक्ष्मणराव बोरावके
स.नं.२९६, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (वि), परवाना व आकाशचिन्ह विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता, परवाना व
आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय लक्ष्मणराव बोरावके
स.नं.२९६, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे-१३

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता, परवाना व
आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.राजेंद्र नामदेव रेंगडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका कंपनीला कारखान्यासाठी दोन पैकी कोणत्या मिळकतीवर परवानगी दिली आहे, याची माहिती चुकीची दिली. एका मिळकतीवर परवानगी घेऊन दुसऱ्या मिळकतीवर अनधिकृतपणे बांधकाम करून कारखाना चालविला असूनही परवानगी मात्र आधीच्या मिळकतीची दाखवून दिशाभूल केली जात आहे. सन २००५ पासून या प्रकरणात कारवाईची मागणी मी करीत आहे. मात्र अद्याप कारवाई केली जात नाही.

जन माहिती अधिकारी - तत्कालीन अधिकाऱ्यांनी सन १९९१ मध्ये चुकीची परवानगी दिली आहे. कारखाना बंद करावा ही अपीलकर्त्यांची मागणी आहे. कारखाना निवासी विभागात असून त्यावर कारवाई करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. देऊ केलेली माहिती अपीलकर्त्यांनी स्वीकारलेली नाही.

'डॉन पॅट्रीक याना एलोमॅटिक इंडिया प्रा.लि. या कंपनीसाठी सर्व्हे नं.२९६/अ/६/ब/२/२ या प्लॉटवर कोणत्याही प्रकारची कामकाज करण्याची परवानगी नाही. त्यावर आजपासून कारवाई करतो. तसेच प्लॉट नं.सर्व्हे नं.२९६/अ/६/ब/२/१ यावर १९९१ साली काही अटीवर पुणे महानगरपालिका, आकाशचिन्ह विभागाने दिलेली परवानगी अटी पूर्ण न केल्याने ताबडतोब रद्द करण्याचे नोटीस देत आहोत. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे त्यांची वीज जोड बंद करण्याबाबत कळवित आहोत,' असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता, परवाना व आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.राजेंद्र नामदेव रेंगडे यानी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले. मात्र त्यानुसार कार्यवाही केलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बोरावके यानी दि.३.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि, अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित मिळकतीवरील कारखान्याला दिलेल्या परवानगीच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात. तसेच सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यानी आयेगाला सादर केलेल्या निवेदनानुसार केलेल्या कार्यवहीची माहिती पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह अपीलकर्त्यास निशुल्क पुरवून जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता, परवाना व आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यानी दि.१५.५.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर राजेंद्र खोमणे
जेजुरी रेल्वे स्टेशन रोड, खोमणेवस्ती, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग प्रमुख, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किशोर राजेंद्र खोमणे
जेजुरी रेल्वे स्टेशन रोड, खोमणेवस्ती, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे श्रीमती सुषमा गणपत कोल्हे

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग प्रमुख, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,

| | |
|---|---|
| | ता.पुरंदर, जि.पुणे श्री.बाळू शिवराम खोमणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - 'बीएसएनएल'ने विनापरवाना मोबाईल टॉवर उभारल्याबाबत नगर परिषदेने केलेल्या करवाईची माहिती पूर्ण व वेळेत मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - 'बीएसएनएल' ही शासकीय संस्था असून टॉवरबाबत तिच्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे व 'बीएसएनएल' च्या पुणे येथील विभागीय कार्यालयाशी पत्रव्यवहार केला असल्याचे संबंधित पत्राच्या प्रतीसह श्री.खोमणे याना कळविले. मात्र निवडणुकीतील कामकाजामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही.

टॉवरच्या संदर्भात परवानगीच्या अनुषंगाने 'बीएसएनएल'कडील कागदपत्रे मागवून अपीलकर्त्यास त्याच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी १५ दिवसांत पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार 'बीएसएनएल'ला दि. ५.१.२०११ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा बांधकाम विभाग प्रमुख, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.बाळू शिवराम खोमणे यानी दि. २८.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केली. मात्र संबंधित प्रकरणातील कारवाईची ही माहिती ठरु शकत नाही. अपीलकर्त्यास नेमकेपणाने कारवाईबाबत कळविले जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित टॉवरचे बांधकाम विनापरवाना असल्यास त्या विषयीच्या कारवाईबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा बांधकाम विभाग प्रमुख, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे यानी अपीलकर्त्याला पुरवावी व दि.१५.५.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र भैरू पाटील
के.डी.देसाई कॉलनी, गारगोटी, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.आण्णासाहेब आप्पाजी भाणसे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.२०.११.२००९ च्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी काहीही कळविले नाही. म्हणून दि.३१.१२.२००९ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,

कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. परंतु त्यानीही दखल घेतली नाही. म्हणून आयोगाकडे अपील केले. दरम्यान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यानी माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्याबाबत दि.१८.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. माहिती ५५ दिवस विलंबाने मिळाली, असे अपीलकर्ता श्री.रामचंद्र भैरू पाटील यानी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

आपण नवीन असल्यामुळे व माहितीच्या अधिकारातील अर्जावरील प्रक्रियेबाबत पुरेशी माहिती नसल्यामुळे विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.आबासाहेब आप्पाजी भाणसे यानी केले. श्री.पाटील यानी प्रथम अपील केल्याची नोंद अपील रजिस्टरमध्ये नसल्याचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.विजय पाटील यानी अपील रजिस्टरच्या छायांकित प्रतीसह सादर केले.

अपीलकर्त्यानी स्वतःच्या खरेदी दस्ताच्या नोंदणीच्या अनुषंगाने नियमातील तरतुदींची माहिती व उतारे मागितले आहेत. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यानी विलंबाबाबत दिलेले स्पष्टीकरण समर्थनीय नाही. कायद्याची माहिती नसणे हे कायदा न पाळण्याबाबतचे समर्थन ठरू शकत नाही. जन माहिती अधिकारी म्हणून काम करताना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील प्रक्रियेची माहिती त्यानी करून घेणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.आबासाहेब आप्पाजी भाणसे यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील प्रक्रियेची माहिती करून घेणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे विलंबाबद्दल त्याना ५५ दिवस विलंबासाठी (५५x२५०) रूपये ११२५०/-इतकी शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील

कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.आबासाहेब आप्पाजी भाणसे यांच्या मे २०११ व जून २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या अनुक्रमे एप्रिल २०११ व मे २०११ च्या वेतनातून दोन हप्त्यात ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यानी करावी. तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार शास्तीची नोंद घेण्याची कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत तुकाराम साळुंखे
टाऊन प्लॅनिंग विभाग, सी. ओ. ई, अपीलकर्ता
शिवाजीनगर, पुणे.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरिक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सूर्यकांत तुकाराम साळुंखे
टाऊन प्लॅनिंग विभाग, सी. ओ. ई,शिवाजीनगर, पुणे.

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा
श्री. सतीश भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरिक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा,
श्री. दिलीप बाबुराव अर्जुन

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केले नसल्याचे निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २९.७.२०१० रोजीच्या सुनावणी दरम्यान केले होते. त्याबाबत अपिलकर्ता श्री. सूर्यकांत तुकाराम साळुंखे यांनी कागदपत्रांसह नोंदविलेला आक्षेप व त्याबाबतचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा खुलासा लक्षात घेऊन सदर अपिलाची फेर सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपिलाची कार्यालयात योग्य नोंद न झाल्यामुळे तसे निवेदन केल्याचे व संबंधितांवर त्याबाबत कारवाई करण्यात येत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा श्री. सतीश भोसले यानी स्पष्ट केले.

वादविषय असलेल्या रस्त्यासह क्षेत्राच्या फेरमोजणीची अपीलकर्त्याची मागणी असून वस्तुतः ती प्रशासकीय कार्यवाहीची आहे . तथापि वस्तुस्थितीच्या संदर्भातील शंका निरसनाच्या दृष्टीने फेरमोजणी करुन माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा, श्री. दिलीप बाबुराव अर्जुन व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा श्री. सतीश भोसल यांनी केले. त्यानुसार आदेश दिल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी दि. १५.२.२०११ व दि. १.३.२०११ च्या पत्रांच्या प्रतींद्वारे आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमोल जिनगोंडा पाटील
रा. वसवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
देशभक्त रत्नप्पाण्णा पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.
गंगानगर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
देशभक्त रत्नप्पाण्णा पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.
गंगानगर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,<br>देशभक्त रत्नप्पाण्णा पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.<br>गंगानगर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर यांचे वतीने<br>ॲड. एस.बी.खंजीरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

'देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार सहकारी साखर कारखाना लि.' ही मल्टीस्टेट को.ऑप.सोसायटी ॲक्टखालील संस्था असून केंद्रीय निबंधकांच्या कक्षेत येते. तसेच या संस्थेला शासनाकडून भाग भांडवल वा अनुदान मिळत नाही. जमीनही कारखान्याच्या मालकीची आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार कारखाना सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही व उक्त अधिनियम त्याला लागू होत नाही, असे प्रतिपादन कारखान्याचे प्रतिनिधी ॲड. एस.बी.खंजीरे यानी केले.

सहकारी संस्थाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येतात, असे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे, म्हणून माहिती मिळाली पाहिजे, असे अपीलकर्ता श्री. अमोल जिनगोंडा पाटील यानी अनुपस्थितीबाबत सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. परंतु उपरोक्त कारखाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २ (एच) मधील तरतुदींनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरतो, तसेच हा कारखाना राज्याच्या सहकार खात्याच्या कक्षेत येतो, असे त्यानी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजयकुमार लक्ष्मण नेवसे
मु. पो. माळीनगर, हनुमान गट, अपीलकर्ता
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक साखर,
पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.
माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विजयकुमार लक्ष्मण नेवसे
मु. पो. माळीनगर, हनुमान गट, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक साखर,
पुणे विभाग, पुणे श्री. डी. आर. घोडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर या कारखान्याकडील विविध स्वरुपाची माहिती ४ अर्जांद्वारे मागितली होती. कारखान्याला राज्य व केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळत असूनही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे कारखान्याचे म्हणणे आहे. कारखान्याला पुढीलप्रमाणे अनुदान/अर्थसहाय्य गेल्या तीन वर्षांत मिळाले असल्याचे कारखान्याच्या अहवालात नमूद केले आहे. जाबदार कंपनी जरी खाजगी क्षेत्रात असली तरी तिचे ३१ मार्च २००८ रोजी भागभांडवल रु. १ कोटी ६५ लाख होते व त्या दिवशी तिला राज्य शासन व केंद्र शासनाकडून एकूण १७ कोटी ९० लाख ७० हजार रुपयांचा वित्त पुरवठा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या झाला होता. त्याचा कंपनीच्या दि. ३१.३.२००९ रोजीच्या अहवालात पान नं. ३२ दिलेला तपशील पुढील प्रमाणे :

परिशिष्ट - १ - भाग भांडवल रु. १,६५,००,०००/-

परिशिष्ट- १४- इतर चालू उत्पन्न रु. १३,०१,८२,५८४/-

(रुपये तेरा कोटी एक लाख ब्याऐंशी हजार पाचशे चौऱ्याऐंशी)

| अ.क्र. | मिळालेली सबसिडी | वर्षे २००७-२००८ | वर्षे २००६-२००७ |
|---|---|---|---|
| १ | राज्य सरकारकडून मिळालेली सबसिडी | १,३१,०२,७४६ | २४,९२,१५९ |
| २ | बफर स्टॉक सबसिडी | २,२३,६२,१७८ | -- |
| ३ | एक्सपोर्ट सबसिडी - राज्य सरकार | १,८१,४९,६०० | -- |
| ४ | एक्सपोर्ट सबसिडी - केंद्र सरकार | ४,७९,६३,०७० | -- |
| | एकूण - | १०,१५,७७,५९४ | २४,१२,१५९ |
| ५ | २००७ ची केंद्र सरकारची आर्थिक सहाय योजना | ७,५०,००,००० | -- |
| | | १७,६५,७७,४९४ | २४,९२,१५९ |
| | **एकूण** | **१७,९०,६९,६५३** | |

**कंपनीला राज्य सरकार व केंद्र सरकारकडून मिळालेली गेल्या ३ वर्षातील सबसिडीचा तपशील.**

| अ.क्र | मिळालेली सबसिडी | वर्षे २००८-२००९ | वर्षे २००७-२००८ | वर्षे २००६-२००७ |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य सरकारकडून मिळालेली सबसिडी | ९२,२३,६०१ | १,३१,०२,७४६ | २४,९२,१५९ |
| २ | बफर स्टॉक सबसिडी | ८९,४३,८४४ | २,२३,६२,१७८ | -- |
| ३ | एक्सपोर्ट सबसिडी - राज्य सरकार | २,१६,७२,४०० | १,८१,४९,६०० | -- |
| ४ | एक्सपोर्ट सबसिडी - केंद्र सरकार | ५७,९४,२०० | ४,७९,६३,०७० | -- |
| ५ | एक्साईज डयुटी लोन (स्किम २००७) गव्हर्नमेंट देणार असलेले व्याज सेंट्रल बँक ऑफ इंडीया | ४१,२२,९३२ | -- | -- |
| ६ | बँक ऑफ बडोदा, अकलूज ३१/३/२००९ अखेर | २८,६०,१३५ | -- | -- |
| | ३१/३/२०१० अखेर अंदाजे (७ कोटी ७० लाखावर १२ टक्के प्रमाणे १ वर्षाचे व्याज) | ९२,४०,००० | -- | -- |
| | **एकूण** | **४,६१,३४,०४५** | **१०,१५,७७,५९४** | **२४,१२,१५९** |

३ वर्षातील एकूण सबसिडी + व्याज इ. = १५,०२,०३,०४५ (१ + २ + ३ )
= १५ कोटी २ लाख
कंपनीचे भाग भांडवल १ कोटी ६५ लाख

हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार कारखाना 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो. त्यामुळे माहिती देणे बंधनकारक करावे.

अपिलीय प्राधिकारी- दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर हा साखर कारखाना खाजगी क्षेत्रातील असून कंपनी कायद्याप्रमाणे नोंदणीकृत संस्था आहे. ती आमच्या अधिकारकक्षेत येत नाही. त्यामुळे त्यांच्याबाबतचे अपील आपल्याला पुढे चालविता येणार नाही, असा निकाल दिला.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील 'सार्वजनिक प्राधिकरण' विषयक तरतुदींच्या अनुषंगाने दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर कारखान्याने लेखी म्हणणे सादर करावे, असे आयोगाचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक साखर, पुणे विभाग,पुणे श्री. डी. आर. घोडे यानी कारखान्याला कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कारखान्यातर्फे ॲड. एस.बी.देव यानी दि. १.१०.२०१० च्या पत्रान्वये

सविस्तर लेखी निवेदन सादर केले. अपीलकर्त्यांनी ४ अर्जांवर एकच अपील केले असून तेही मुदतबाहय आहे. तसेच सक्षम न्यायासनाकडे त्यानी प्रथम अपील केलेले नाही, असे त्यात म्हटले असून पुढील मुद्दे नमूद केले आहेत:

'अपीलकर्ता याने मागितलेली सर्व माहिती पाहता ती उघड केल्यास जाबदार यांचे वाणिज्य क्षेत्रातील माहिती, व्यापारविषयक गुपिते किंवा बौध्दिक संपदा संपुष्टात येऊन त्रयस्थ पक्षास स्पर्धात्मक हानी पोहचून कोणतेही कारण नसताना वैयक्तिक खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होऊन जाबदार यांचे अस्तित्वच संपुष्टात येणार असल्याने कलम ८ (घ)(त्र) अन्वये सदरची माहिती देता येणार नाही.

अपीलकर्ता याने मागितलेली माहिती त्रयस्थ इसमांची वैयक्तिक आर्थिक माहिती असून, तीपण त्यांचे संमतीशिवाय कलम ११ अन्वये देता येत नाही.

जाबदार संस्था ही कंपनी कायद्याप्रमाणे नोंदणीकृत संस्था असून, माहिती अधिकार कायदा सन २००५ चे पूर्वीपासून अस्तित्वात असणारा कंपनी कायदा त्याना लागू असून सदरचे कंपनी कायदा कलम १६३, २०९, १९६, २१९ इत्यादी कलमाचे तरतुदीनुसार त्याना काही माहिती फक्त सभासदांना, काही माहिती फक्त प्रत्यक्ष पाहणी, परंतु त्याच्या नकला देण्यास बंधन व काही माहिती पूर्णपणे देण्यास बंधन अशा विविध तरतुदी असल्याने कंपनी कायद्याने बंधन घातलेली माहिती जाबदार अपीलकर्ता याना देऊ शकत नाही.

जाबदार कारखान्यास सहकारी साखर कारखान्यानुसार कोणत्याही आर्थिक सवलती अगर पॅकेज किंवा मदत मिळत नाही. खालील रकमा या शासनाचे धोरणात्मक निर्णयानुसार कर्ज अथवा अनुदान म्हणून प्राप्त झालेल्या आहेत.

साखर कारखान्यांचे ठराविक कालावधीनंतर, पण जादा कालावधीसाठी साखर कारखाने सुरु ठेवून पूर्व परवानगीशिवाय बंद करु नयेत अशी शासनाने अट घालून त्यासाठी त्यावेळी होणारे साखर उतारा घट अनुदान देण्याबाबत परिपत्रक ता. १३/४/२००७ व ५/७/२००८ रोजी जाहीर केल्यावरुन जाबदार यानी आर्थिक तोटा सोसून जादा कालावधीसाठी कारखाना सुरु ठेवल्याने दरम्यानचे काळात झालेले नुकसान हे शासनाने साखर उतारा घट अनुदान म्हणून सर्व कारखान्याबरोबर दिलेले आहे. ती रक्कम आर्थिक मदत नसून नुकसानभरपाई आहे.

वाहतुक खर्च म्हणून केवळ दिलेली सदरची रक्कम रु.४,७९,६३,०७०/- आणि रु. १,८१,४९,६००/- ही असून तो प्रत्यक्षात वाहतुक खर्च आहे.

केंद्र सरकारने पुढील दोन वर्षात उत्पादित होणारे साखरेवर भरावी लागणारी एक्साईज डयुटी रकमेएवढे कर्ज संबंधित बँकांनी कारखान्यास द्यावे व त्यावरील व्याज केंद्र सरकारचे एस.डी.एफ फंडातून केंद्र सरकारने परस्पर बँकाना देण्याचे ठरलेले होते. सदरच्या कर्जाची परत फेड संबंधित दोन गळीत हंगाम सोडून त्यानंतरचे पुढील दोन वर्षाचे गळीत हंगामात करण्याचे आहे, त्यासाठी सर्व सहकारी साखर कारखान्यांना राज्य सरकारने हमी दिलेली होती, परंतु जाबदार कारखाना खाजगी असल्याने शासनाने तशी हमी दिली नाही, त्यामुळे त्यानी कंपनीची मालमत्ता तारण देऊन तसेच सर्व संचालकांनी वैयक्तिक हमी देऊन कर्ज घेतलेले असून नियमाप्रमाणे त्याची परतफेड अद्याप करण्याची आहे.

वरीलप्रमाणे अर्जदार हे म्हणत असलेली कोणतीही रक्कम आर्थिक मदत नसून पूर्णपणे कर्ज अथवा घातलेल्या बंदी आदेशामुळे झालेली नुकसान भरपाईची रक्कम आहे.'

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता 'दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर' कारखान्याला शासनाकडून भरीव आर्थिक सहाय्य मिळाल्याचे दिसून येते. संस्था कंपनी कायद्याखाली नोंदणीकृत असली तरी, आणि मिळालेली रक्कम ही खर्चाची प्रतिपूर्ती आहे हा कारखान्याचा दावा क्षणभर मान्य केला, तरी ते अर्थसहाय्यच ठरते आणि रु. १ कोटी ६५ लाख भाग भांडवलाच्या व सुमारे १३ कोटी रुपये चालू उत्पन्न असलेल्या कारखान्याला तीन वर्षांच्या कालावधीत मिळालेली रुपये १७ कोटींहून अधिक रक्कम हे भरीव अर्थसहाय्य असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार हा कारखाना 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्याला लागू होतो. सभासदांच्या वैयक्तिक आर्थिक व्यवहारांची व कारखान्याच्या आर्थिक संबंधांवर परिणाम होईल, अशी माहिती न देण्याची कारखान्याची भूमिका रास्त आहे. तथापि कर्ज, कर्जफेड, अनुदान आदिंची माहिती ही अशा स्वरुपाची नाही. त्यामुळे सार्वजनिक स्वरुपातील सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर या कारखान्याने सभासदांच्या वैयक्तिक आर्थिक व्यवहाराची व कारखान्याच्या आर्थिक हितसंबंधाला बाधा येईल अशी माहिती वगळता कर्ज, कर्जावरील व्याज, थकबाकी इ. स्वरुपाची संस्थेच्या आर्थिक व्यवहारासंदर्भात सार्वजनिक स्वरुपाची असलेली माहिती अपीलकर्त्यास योग्य ते शुल्क आकारुन पुरवावी व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यानी दि. १५.५.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आदित्य अरविंद कुलकर्णी
२१५, कसबा पेठ, फलटण, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद,
ता.फलटण, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, फलटण नगरपरिषद,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.आदित्य अरविंद कुलकर्णी<br>२१५, कसबा पेठ, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

बांधकामाला दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्रातील सेफ्टीटँकच्या बांधकामासंदर्भात माहिती मागितली होती. परंतु ती नेमकी दिली जात नाही. सेफ्टीटँक बांधला आहे की नाही, याची तपासणी करुन माहिती द्यावी, अशी मागणी असून छायाचित्रासह पुरावा देऊनही त्याची शहानिशा केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आदित्य अरविंद कुलकर्णी यानी केली.

उभय बाजूनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. विशिष्ट प्रकरणात तपासणी करुन माहिती द्यावी, ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि बांधकामाच्या संदर्भात जागेवरील वस्तुस्थितीनुसार सत्य माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार संबंधित जागेमधील सेफ्टीटँकच्या बांधकामाबाबत प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थितीनुसार माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, फलटण नगरपरिषद, ता.फलटण, जि.सातारा यांनी अपीलकर्त्यास देऊन दि. १५.५.२०११ पर्यंत अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय खंडू खरात
स.नं.३१/१, मिलिंद निवास, चौधरीनगर, धानोरी, पुणे-४११०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय खंडू खरात
स.नं.३१/१, मिलिंद निवास, चौधरीनगर, धानोरी, पुणे-४११०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे
विद्यमान-श्री.अशोक रामचंद्र जाधव, तत्कालीन-श्री.सुनिल इंदलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - जमिनी एकत्रिकरण योजनेत सन १९७४ मध्ये कुठलाही हितसंबंध नसतांना अन्य दोन व्यक्तींची नोंद योजना पत्रकात बेकायदेशीरपणे केली आहे. या प्रकरणातील अन्य कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या असल्या तरी संबंधित व्यक्तींची नावे लागण्याबाबतची माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> - श्री. खरात यानी अर्जात कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या नाहीत. ज्या प्रकारची माहिती तयार करुन देण्याची मागणी ते करीत आहेत ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहितीच्या संज्ञेत येणारी नाही. तसे त्याना विहित मुदतीत कळविले. याच विषयाच्या अनुषंगाने श्री. खरात सातत्याने अर्ज व पत्रव्यवहार करीत असून वेळावेळी त्याना कागदपत्रांच्या प्रती देण्यात आलया आहेत. तसेच अपील क्र.२०२९ मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कार्यालयातील सर्व उपलब्ध अभिलेख त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिले होते. त्यांनी मागणी केल्यास त्यातील प्रती देता येतील. मात्र एकच माहिती वेगवेगळया स्वरुपात अर्ज व अपिले करुन मागण्यामागे केवळ जन माहिती अधिकाऱ्यांना त्रास देण्याचा त्यांचा हेतू असल्याचा दिसते. पोट हिस्सा मोजणीने नावांची नोंद झाली असून प्रकरण सध्या दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - श्री. खरात याना हव्या असलेल्या अभिलेखांच्या छायाप्रती देण्याचे आदेश दिले होते. काही अभिलेख ७/१२ उताऱ्यावरुन तयार केले जातात. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. मात्र अभिप्रायाच्या स्वरुपाचे उत्तर देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत शक्य नाही.

श्री. खरात यांचा मूळ अर्ज सर्व उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे पाठवून अभिलेखांची सखोल पडताळणी करुन शोध घ्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ७.१.२०११ च्या पत्रान्वये कार्यवाही केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बाळासाहेब वा.वानखेडे यांनी आयोगास अवगत केले. अभिलेखात असलेल्या कागदपत्रांच्या प्रतीच अपीलकर्त्यास मागता येतील. अन्वयार्थ, अभिप्राय

अथवा कागदपत्रे तयार करुन देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अभिलेखांच्या शोधातून झालेल्या निष्पत्तीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी दि.१५.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गंगाकिसन भाई ओझा
छत्रपती शिवाजी चौक, दौंड, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गंगाकिसन भाई ओझा
छत्रपती शिवाजी चौक, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे प्रतिनिधी श्री.प्रदीप रामचंद्र तावरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रदीप रामचंद्र तावरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मिळकत पत्रिकेवर ज्या आधारे नोंद झाली त्या खरेदी विक्री आदेशाची नक्कल मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपिलकर्त्यांचा दि. १.४.२००९ चा अर्ज अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे जिल्हा यांच्याकडे केला होता. दि.२.४.२००९ ला तो आमच्याकडे वर्ग झाला. दि.१७.४.२००९ रोजी उत्तर पाठविले. ते मिळाले नसल्याचे त्यानी कळविल्यानंतर दि.११.५.२००९ रोजी पुन्हा पत्र पाठविले. माहिती मागणीच्या अर्जात त्यानी खरेदी विक्री या शब्दाचा वापर न करता संबंधित नगर भू-मापन क्रमांक आदेशाची मागणी केली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मिळकत पत्रिकेवरील नोंदीच्या नकलांसह सर्व माहिती दिली. ब सत्ता प्रकारातील जमिनीबाबतचा हा विषय असून अपीलकर्त्यांना संपूर्ण संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहिती बाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र राघू निंबाळकर
पौड रोड, केळेवाडी सर्व्हे नं. ४४, अपीलकर्ता
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे ४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
एकात्मिककृत घटक, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभायगी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (पौड) मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रामचंद्र राघू निंबाळकर
पौड रोड, केळेवाडी सर्व्हे नं. ४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
एकात्मिककृत घटक, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. अ. शं. खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभायगी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (पौड) मुळशी, जि. पुणे श्री. सी.टी.नाईक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - रस्त्याच्या कामाबाबतची परिपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसून कामाचा दर्जा अपेक्षित असल्याप्रमाणे वाटत नाही व गैरप्रकार झाले असल्याची शंका आहे. प्रशासकीय मान्यतेपेक्षा अवाजवी जादा खर्च झाल्याचे प्रथमदर्शनी वाटते. एस.टी.गाडीही रस्त्याने जाऊ शकत नाही. म्हणून सर्व माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यास सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली . मजुरांची संख्या,दरपत्रक, निविदा, अंतिम देयकाचे प्रदान आदि सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास विहित

मुदतीत माहिती देण्यात आली आहे. कामाच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेले संशय व शक्यता हा अभिलेखातील 'माहिती'चा व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी यानी संबंधित रस्त्याचे काम करणा-या ठेकेदाराकडील या कामाबाबतची कागदपत्रे अवलोकनासाठी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी व लेखी मागणी केल्यास त्यातील कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्याव्यात असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.गोरक्ष गंगाधर बोरकर
दिप हाईटस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, फ्लॅट नं.१८, दुसरा मजला,
कॅनरा बँकेच्यावर, रामवाडी, पुणे नगर रोड, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.गोरक्ष गंगाधर बोरकर
दिप हाईटस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, फ्लॅट नं.१८, दुसरा मजला,
कॅनरा बँकेच्यावर, रामवाडी, पुणे नगर रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.विलास लक्ष्मण कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.वैभव भानुदास कडलाख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतील मौजे लोहगाव येथील वैशाखी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित व वैशाली सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या संस्थांचे सभासद महाराष्ट्र शासनातील अधिकारी आहेत. मात्र त्यांनी महानगरपालिकेतील यंत्रणा हाताशी धरुन व अधिकाराचा गैरवापर करुन महानगर पालिकेच्या करआकारणी रजिस्टरला जाणूनबुजून सभासदांच्या नावांची नोंद केलेली नाही व कर भरलेला नाही. या सोसायटयांची जमीन जप्त करुन तसा ७/१२ सदरी इतर हक्कात शेरा ठेवण्यास आमच्या शिरूर तालुका जनहित प्रतिष्ठान या संस्थेने भाग पाडले. परंतु सुमारे अडीच कोटी रुपयांची रक्कम वसूल करण्याची कारवाई केली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> - सोसायटीतील जमीनीवरील कर आकारणी सन १९९०-९१ मध्ये करण्यात आली असून प्रत्यक्ष जागेवर बांधकाम नाही, खुली जागा आहे. सभासदांचे निवासी पत्ते आमच्याकडे उपलब्ध नाहीत. बांधकामाला परवानगी देऊ नये अशा स्वरुपाची नोटीस प्रस्तुत केली आहे. परंतु अपीलकर्त्यांची मागणी आहे त्याप्रमाणे मिळकतकराच्या वसूलीसाठी जमिनीचा लिलाव आदि कार्यवाही केलेली नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला विषय सार्वजनिक हिताचा आहे. परवानगी दिलेल्या गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांची नांवे व अन्य कोणताही तपशील महागनरपालिकेच्या दप्तरी उपलब्ध नाही, ही बाब आश्चर्याची आहे. ही नांवे उपलब्ध करुन घेऊन मिळकतकराच्या वसूलीसाठी गेल्या २० वर्षात महानगरपालिकेने केवळ नोटीसा देण्याव्यतिरिक्त कोणती ठोस कार्यवाही केली हे समजणे हा नागरिकांचा हक्क आहे.

**<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) या संस्थांच्या सभासदांची नावे, निवासी पत्ते, उपलब्ध करुन घेणे व मिळकत कराची वसूली करणे याबाबत केवळ नोटिसा देण्यासारख्या तांत्रिक कार्यवाहीपलिकडे जाऊन महानगरपालिकेने कोणती ठोस पावले उचलली याची चौकशी आयुक्त,महानगरपालिका पुणे यांनी करावी व या माहितीचा अहवाल दि.३०.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

प्रत - आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय अंबाडे,
संपादक, पिंपरी चिंचवड समाचार,
ब्लॉक नं. ३/५७६, शिवाजीनगर, — अपीलकर्ता
जंगली महाराज रोड, पुणे ४११ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत २ रा मजला, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत २ रा मजला, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/११/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. विजय अंबाडे, संपादक, पिंपरी चिंचवड समाचार,<br>ब्लॉक नं. ३/५७६, शिवाजीनगर,<br>जंगली महाराज रोड, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आनंद गायकवाड<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,<br>मध्यवर्ती इमारत २ रा मजला, पुणे श्री. रा. ब. आंटव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी - महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विठ्ठलवाडी येथे कार्यालय नसताना एका अधिका-याच्या सोयीसाठी तेथे गाडी लावली जाते. तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. एस.एन.गरांडे यानी वैयक्तिक कामासाठी सरकारी वाहनाचा वापर केलेला असतानाही व लॉगबुक मध्ये नोंदी असतानाही नोंदी नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले. दिलेल्या नोंदी खोटया आहेत. दि. २६.५.२००८, दि.५.७.२००८ , व दि. १५.७.२००८ अशा तीन अर्जाद्वारे ही माहिती मागितली होती. ती योग्य न मिळाल्यामुळे एकच अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या सर्व अर्जांना विहित मुदतीत उत्तरे दिली. पूर्वी विठ्ठलवाडी येथे स्टोअर होते व कार्यकारी अभियंता याना फिरती होती. त्यामुळे वाहन तेथे लावले जात होते.लॉगबुकातील नोंदींच्या छायाप्रती दिल्या असून त्या मूळाबरहुकूम आहेत. खोटया नोंदींचा प्रश्न येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली आहे. वाहनाचा गैरवापर, खोटया नोंदी या अपीलकर्त्यांच्या तक्रारी हा सार्वजनिकदृष्टया महत्वाचा विषय असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत २ रा मजला, पुणे श्री. रा. ब. आंटव यानी सर्व संबंधित अभिलेखांचे अवलोकन करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या ५० पृष्ठांपर्यंतच्या प्रती लेखी मागणीनुसार निःशुल्क पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आ.स.जाधव
३९, शनिवार पेठ, एस.टी.स्टॅण्ड समोर, अपीलकर्ता
कराड (सातारा)

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मा. मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४५/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

श्री. प्रतापसिंह गणपतराव जाधव, संपादक, दैनिक पुढारी याना कराड नगर परिषदेने जुलै १९९१ व मार्च १९९२ मध्ये दिलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता श्री. आ.स.जाधव यानी मागितल्या होत्या. संबंधित प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्यामुळे व त्या बाबतची सर्व कागदपत्रे त्या कामी वकिलांकडे देण्यात आली असल्यामुळे ती प्राप्त करुन घेऊन प्रती दिल्या. अभिलेख अवलोकनासाठीही येण्याबाबत कळविले. अपीलकर्त्याच्या ताब्यातील बेकायदेशीर बांधकामावरील कारवाई हा अपीलकर्त्याचा खरा विषय असून त्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांविरुध्द अशा प्रकारचे अर्ज, अपिले, न्यायालयीन खटले आदि मार्ग अपीलकर्ता श्री. आ.स.जाधव अवलंबित आहे.अशा प्रकारचे सुमारे ७५ अर्ज त्यांनी केले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,

कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला यानी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित विषयाबाबतचे तपशीलवार व अभिप्रायासह लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी यानी १० दिवसांत आयोगाला सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. के. एन. कुंभार यानी दि. १.३.२०११ च्या पत्रान्वये तपशीलवार लेखी निवेदन सादर केले. 'कराडमध्ये ए.बी.बिल्डर्स ,मुंबई यानी सन १९८७ साली बांधकाम परवानगी घेऊन प्रत्यक्ष बांधकाम करताना मंजूर परवानगीपेक्षा काही बांधकाम वेगळे केले. त्यात श्री. जाधव यांच्या फ्लॅटचा समावेश आहे. नगर परिषदेने ए.बी.बिल्डर्स विरुध्द सुरु केलेल्या कारवाईबाबतही श्री. जाधव यानी तक्रारी केल्या. तसेच मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यातील आदेशानुसार नगर पालिकेने कार्यवाही सुरु केली. त्याविरुध्द श्री. जाधव यानी संचालक नगररचना, पुणे यांच्याकडे केलेले अपील फेटाळले गेले. त्याविरुध्द त्यानी मुंबई उच्च न्यायालयात केलेली याचिका न्यायालयाने रद्द केली. ए.बी.बिल्डर्स यांचे बेकायदेशीर इमारतीपैकी इतर भाग पाडावा मात्र स्वतःच्या ताब्यातील बाल्कनी पाडू नये', अशी त्याची या याचिकेतील मागणी होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द श्री. जाधव यानी सर्वोच्च न्यायालयात केलेला अर्जही न्यायालयाने फेटाळला. या सर्व कारवाईत (जन माहिती अधिकारी) श्री. मुल्ला हे नगर अभियंता म्हणून कार्यरत

असून बेकायदेशीर बांधकाम पाडणबाबत आग्रही आहेत. त्यामुळे श्री. जाधव यानी त्यांच्या विरुध्द विविध तक्रारी अर्ज, खटले, आरोप, श्री. मुल्ला यांच्या मानसिक व शारीरिक तपासणीच्या मागणीचे अर्ज इ. केले आहेत. केवळ माहितीच्या अधिकारात ४७ अर्ज त्यानी केले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगर परिषद, कराड यानी संबंधित कागदपत्रांच्या तपशिलासह निवेदनात नमूद केले आहे. ते लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा अपीलकर्त्यांनी केलेला हा वापर योग्य म्हणता येणार नाही. प्रस्तुत अपिलात जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. के. एन. कुंभार यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती पद्मावती वसंतराव फाटक
१०५, बटुकेश्वर कॉलनी, चुंबखडी, अपीलकर्ता
शिंगणापूर रोड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, भुसारीवाडी, बिंदु चौक,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधिन, उपनिबंधक,
सहकारी संस्था, भुसारीवाडी, बिंदु चौक,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता-** श्रीमती पद्मावती वसंतराव फाटक
१०५, बटुकेश्वर कॉलनी, चुंबखडी,
शिंगणापूर रोड, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अशोक वसंतराव फाटक

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, भुसारीवाडी, बिंदु चौक,
ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. सुनिल सिंगतकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - श्री सिध्दबटुकेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी जुलै १९९६ मध्ये रद्द करण्यात आलेली असताना व मुंबई उच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केलेले असतानाही संस्था अस्तित्वात असल्याची खोटी माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था करवीर तालुका, कोल्हापूर श्री.भारत मोरे यानी जाणीवपूर्वक दिली. दि. २४.५.२००९ च्या आपल्या अर्जाला दि. २६.५.२००९ रोजी, म्हणजे अत्यंत त्वरेने उत्तर देऊन ही खोटी माहिती श्री. भारत मोरे यानी दिली. त्यांच्या या पत्राचा आर्थिक गैरव्यवहारासाठी वापर केला जात असून संगनमताने असे खोटे पत्र देण्यात आले असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भारत मोरे यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

<u>जन माहिती अधिकारी</u> - सन १९८७ मध्ये संस्थेची नोंदणी झाली होती. जुलै १९९६ मध्ये ती रद्द करण्यात आली. उच्च न्यायालयानेही या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. सन १९९६ मध्ये संस्था अवसायनात गेली. पत्रकारपरिषद घेऊन तसे जाहीर केले होते व संबंधित कार्यालयाला लेखी दिलेले होते. असे असतानाही संस्था अस्तित्वात असल्याचे दर्शविणे योग्य नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भारत मोरे सेवानिवृत्त झाले आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेत श्री सिध्दबटुकेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था ही अवसायनात गेल्याचे व सहकार खात्याच्या कागदोपत्री तशी स्पष्ट नोंद असल्याचे दिसून येते. तरीही संस्था अवसायनात गेली नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भारत मोरे यानी अपीलकर्त्यास कळविले. एवढेच नव्हे, तर माहिती देण्यासाठी म्हणून त्या संस्थेच्या सचिवांना प्रतही पृष्ठांकित केली. जाणीवपूर्वक खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्याचा हा प्रकार स्वयंस्पष्ट असून त्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भारत मोरे याचा स्वतंत्रपणे खुलासा घेणे आवश्यक नाही. ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अभिलेखात स्पष्ट नोंदी असतांनाही खोटी व दिशाभूल करणारी माहिती जाणीवपूर्वक देण्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भारत मोरे याना एकूण रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून जून २०११ पासून ८ हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसारीवाडी, बिंदु चौक, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. सुनिल सिंगतकर यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दादासाहेब नामदेव कांबळे
मु. पो. पांचवड, ता. वाई, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
धर्मवीर संभाजी पतसंस्था मर्यादित, शाहूपुरी, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२८/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दादासाहेब नामदेव कांबळे
मु. पो. पांचवड, ता. वाई, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
धर्मवीर संभाजी पतसंस्था मर्यादित, शाहूपुरी, सातारा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - धर्मवीर संभाजी सहकारी पतसंस्था मर्या. शाहूपुरी, गेंडामाळ, सातारा या पतसंस्थेकडे सन १९९९ मध्ये कर्ज मागणी केली होती. परंतु कर्ज मिळाले नाही. मात्र पगारातून दरमहा २००० रुपये कपात करण्यात येत आहे. त्यामुळे मला दिलेल्या कर्जाबाबतचा तपशील कागदोपत्री पुराव्यासह मिळावा, अशी मागणी करुनही माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी- श्री. कांबळे हे पशुवैद्यकीय अधिकारी असून त्यानी कर्ज घेतलेले आहे. त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याना देण्यात आल्या असून या प्रकरणी त्यानी दाखल केलेला दिवाणी दावा प्रलंबित आहे. यापूर्वीही अशा कागदपत्रांच्या नकला त्याना देण्यात आल्या आहेत. तसा कबुली जबाबही त्यानी दिला असून कर्ज बुडविणे एवढाच त्यांचा उद्देश आहे.

अपिलीय प्राधिकारी- माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून घ्यावी लागेल. अपिलीय प्राधिकारी यानी संस्थेकडून संबंधित माहिती /कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेऊन १० दिवसांत अपीलकर्त्यास पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी यानी दि.१८.३.२०११ च्या पत्रान्वये संस्थेला कळविले व संस्थेने सर्व कागदपत्रांच्या प्रती पुरविल्याचे दि. २८.३.२०११ च्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अरुण नामदेव पाटील
मु. पो. ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
ग्राम पंचायत जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, करवीर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. अरुण नामदेव पाटील<br>मु. पो. ता. करवीर, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>ग्राम पंचायत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. नागेश कांबळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, करवीर श्री. ओ. के. गहाणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :अपीलकर्ता - सामाईक जागेत बांधकामाला ग्रामपंचायतीने दिलेली परवानगी बेकायदेशीर असून त्या संदर्भात व संबंधित क्षेत्राची मोजणी करुन योग्य माहिती जन माहिती अधिकारी देत नाहीत. अपिलीय प्राधिकारी यानी आदेश देऊनही पृष्ठांकन व प्रमाणित करुन माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांची मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्यासाठी संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने जागेची मोजणी करुन अपीलकर्त्यांनी हद्दी निश्चित करुन घेणे आवश्यक आहे, असे वेळोवेळी अपीलकर्त्यांना व त्यांच्याशी संबंधितांना स्पष्ट केले आहे. त्यानी मोजणी करुन घेतलेली नाही. अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशानुसार माहिती पृष्ठांकित व प्रमाणित करुन दिली. सर्व माहिती वेळोवेळी दिली असून अपीलकर्ता व त्यांचे संबंधित पुन:पुन्हा त्याच मागणीसाठी/ तक्रारीसाठी अर्ज व अपिले करीत असतात. माहितीच्या अधिकारात ७ वेळा, तक्रार अर्ज ८ वेळा व या व्यतिरिक्त लोकशाहीदिन आदीमध्ये अपीलकर्ता, त्यांचे वडील इ. मंडळीनी अर्ज केले आहेत. ग्रामपंचायतीनेही ६ वेळा तीच माहिती दिली आहे.

याच आशयाचे तपशीलवार लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी श्री. ओ. के. गहाणे व अपिलीय प्राधिकारी श्री. नितीन माने यांनी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत न येणाऱ्या तक्रारीसाठी अपीलकर्ता व त्यांचे निकटवर्ती पुन:पुन्हा त्याच स्वरुपाची मागणी करणारे अर्ज व अपिले करीत आहेत. आयोगासह सर्व यंत्रणांच्या वेळेचा व कार्यशक्तीचा अपव्यय करणारी ही कृती आहे. तसेच जाणीवपूर्वक केलेल्या अशा कृतींमुळे अन्य अर्जदार/अपीलकर्ते यांच्या अर्ज/अपिलासंदर्भातील कार्यवाहीवर अप्रत्यक्षपणे विलंबाच्या स्वरुपाचा परिणाम होऊ शकतो, व माहितीच्या अधिकाराच्या वापराबाबत गैरसमज निर्माण होण्यास पुष्टी मिळते याची जाणीव अपीलकर्त्यांनी ठेवली पाहिजे. तसे न झाल्यास अशी अपिले दखल घेण्यायोग्य ठरणार नाहीत, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रमोद नारायण पुजारी
घर नं.९, नृसिंहवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**(१) जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर
**(२)जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री दत्त विद्यामंदिर, नृसिंहवाडी,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रमोद नारायण पुजारी
घर नं.९, नृसिंहवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री.दत्तात्रय शंकर पोवार

**(२)जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री दत्त विद्यामंदिर, नृसिंहवाडी,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर सौ.उषा रामप्रमोद कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सदर अपील चालविण्याचे प्रयोजन राहिले नाही, त्यामुळे सदर अपील मी काढून घेत आहे, असे अपीलकर्ता श्री.प्रमोद नारायण पुजारी यानी लेखी निवेदन दि.९.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

सबब आयोगाचे आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. निवृत्ती विष्णू साळुंखे
जिल्हा परिषद सातारा, ता. कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (क.क.),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तथा कृषी सहसंचालक (क.क.),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. निवृत्ती विष्णू साळुंखे
जिल्हा परिषद सातारा, ता. कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (क.क.),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. अशोक बसवंत कवचाळे

**जन माहिती अधिकारी** तथा तथा कृषी सहसंचालक (क.क.),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. अशोक भगवान देसाई

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत व मूळ प्रकरणातील भ्रष्टाचाराच्या तक्रारीची चौकशी सुरु असताना संबंधित अधिका-यांना पदोन्नती कशी दिली, याची माहिती नाकारण्यात आली. पदोन्नती बेकायदेशीर असून मूळ तक्रारीत ७ कामांच्या तपासणीची मागणी असताना दोन गटांची तपासणी केलेली नाही. भ्रष्टाचार दडविण्यासाठी अशी नियमबाहय कार्यवाही अधिकारी करीत आहेत.

जन माहिती अधिकारी- संबंधित प्रकरणाची चौकशी चालू असल्यामुळे अहवालाच्या व संबंधित कागदपत्रांच्या प्रती दिल्यास पुढील कार्यवाहीवर परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे त्या दिल्या नाहीत. विहित मुदतीत उत्तर देऊन देय माहिती पुरविली.

अपिलीय प्राधिकारी- पदोन्नतीच्या संदर्भातील शासन निर्णयाच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या. चौकशी अद्याप पूर्ण झाली नसल्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे व त्रयस्थ पक्षांचे जाबजबाब याच्या प्रती देता येणार नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती बाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. मूळ प्रकरणातील चौकशी योग्य प्रकारे झाली नसल्याची व पदोन्नती आदि कार्यवाही बेकायदेशीर असल्याची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक महारुद्र रायचुरे
मु. पो. जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसचिव,
ग्रामपंचायत जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अशोक महारुद्र रायचुरे
मु. पो. जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर श्री. व्ही. बी. कोळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसचिव,
ग्रामपंचायत जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. एस.डी. कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मला दिलेला बांधकाम परवाना व शेजाऱ्याने केलेले अतिक्रमण या संदर्भात वारंवार तक्रारी करुनही कारवाई केली जात नाही व योग्य माहितीही दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांची मागणी माहितीची नाही, त्यांचया मते अतिक्रमण असलेल्या प्रकरणी कारवाई करण्याची आहे. या एकाच विषयासंदर्भात अपीलकर्ता वेळोवेळी अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत आले आहेत. याच संदर्भातील त्यांची १०७०/सोलापूर, १२७२/२०१०/सोलापूर, २१९/२०११/सोलापूर ही अपिले आयोगाने यापूर्वी निकाली काढली आहेत. आमच्या कार्यालयाच्या कक्षेतील माहिती दिली आहे. पंचायत समितीकडील माहितीही घेऊन दिली आहे. ५ मुद्दे आमच्याशी संबंधित नसून नगर भूमापन कार्यालयाच्या कक्षेतील आहेत.

प्रशासकीय कार्यवाहीच्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तरीही एकाच विषयाबाबत व त्याच मागणीसाठी पुन:पुन्हा अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणाचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय अपीलकर्ता करीत आहेत, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य वापर नाही. त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे. आवश्यक असल्यास संबंधित कार्यायालांकडील अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता प्राप्त करुन घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष किसन भालेराव
३१३, शाहूनगर, उपळाई रोड, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.सोपान कृष्णा मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सोपान कृष्णा मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुभाष भिमराव भालेराव यानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर संस्थेकडील सन २००० पासूनची आरक्षण विषयक माहिती तसेच सन २००५ पासून संस्थेकडे माहिती अधिकारान्वये दाखल झालेले अर्ज व त्याना दिलेली माहिती याचा फ्लॉपी स्वरुपात तपशील, अशी माहिती मागितली होती. संस्था सार्वजनिक न्यास असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. म्हणून माहिती देता येत नसल्याचे कळविले. तसेच प्रदिर्घ काळातील व व्यापक स्वरुपाची माहिती संकलित करुन देण्याची मागणी अपीलकर्त्यानी केली आहे. उपरोक्त अधिनियमानुसार तसे करता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.सोपान कृष्णा मोरे यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४११००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना,
झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना,
झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४११००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे तत्कालीन श्री.अनिरूध्द घन:श्याम पावसकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे तत्कालीन श्री.भारत दिगंबर मोहिते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : हस्तांतरणीय विकसन हक्क प्रमाणपत्रांच्या (डीआरसी) छायाप्रती दि.१७.७.२००९च्या अर्जान्वये मागितल्या होत्या. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तीस दिवसांच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले नाही. त्यामुळे दि.२८.८.२००९ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. त्याच दरम्यान जन माहिती अधिकारी यानी शिपायाकरवी ११०० प्रती घरी पाठविल्या. मात्र त्यात काही प्रमाणपत्रांच्या दोन-दोन, तीन-तीन प्रती आहेत. हव्या असलेल्या ४७६ प्रमाणपत्रांच्या प्रती मिळाल्या. परंतु ३७८ प्रमाणपत्रांच्या प्रती अद्यापही मिळालेल्या नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नसल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी अपील निर्णयात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी याना शास्ती व्हावी, असा माझा आग्रह आहे.

जन माहिती अधिकारी : श्री.पुंडे यानी वेळोवेळी टीडीआर संदर्भात माहिती मागितली असून त्या त्या वेळी छायांकित प्रतीसह ती त्याना देण्यात आली. प्रस्तुत अर्जात त्यानी 'सुरमवातीपासून ते अद्यापपर्यंत' अशा स्वरूपात माहिती मागितली असून त्या सर्व प्रकरणांच्या सुमारे २५ ते ३० हजार संचिका आहेत. त्यातून माहिती शोधून प्राप्त झाली ती चाळीस दिवसांत घरपोच दिली. माहिती नाकारण्याचा काही उद्देश व प्रयत्न नाही. त्यामुळे दंडात्मक कारवाई होऊ नये, अशी विनंती आहे.

अपिलीय प्राधिकारी : श्री.पुंडे यांच्या याच स्वरूपाची माहिती मागणाऱ्या अर्जानुसार वेळोवेळी माहिती दिली आहे. प्रस्तुत अपिलात विहित मुदतीत उत्तर पाठविले गेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र माहितीचा शेध घेण्याची कार्यवाही करण्यात येत होती. श्री.पुंडे याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती व संचिका यांची संख्या लक्षात घेता, शोधून माहिती देण्यासाठी लागलेला विलंब क्षमापित व्हावा, अशी विनंती आहे.

ऊर्वरित ३७८ हस्तांतरणीय विकसन प्रमाणपत्रांच्या प्रती दिल्या गेलेल्या नाहीत, असे नमूद करून त्याची यादी श्री.पुंडे यानी सादर केली आहे. मात्र अशी यादी त्यानी मूळ अर्जात व अपिलातही दिलेली नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यांकडून या यादीची प्रत प्राप्त करून घेऊन १५

दिवसांत प्रती पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.पुंडे यानी दि.३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र वेळोवेळी सूचित करूनही या प्रती श्री.पुंडे यानी ताब्यात न घेतल्याने दि.७.२.२०११ च्या पत्रान्वये टपालाने पाठविण्यात आल्या, असा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.भारत दिगंबर मोहिते यानी दि.७.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अपीलकर्त्यांनी विशिष्ट कालावधीनमूद न करता मागितलेली विस्तृत माहिती मोठ्या प्रमाणावरील कागदपत्रांमध्ये शोधून द्यावयाची असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त असले तरी अपीलकर्त्यास तीस दिवसांच्या विहित मुदतीत उत्तर दिले जाणे आवश्यक होते. याची समज म्हणून जन माहिती अधिकारी याना शास्ती लावणे अपरिहार्य ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर न दिल्याबद्दल समज म्हणून व माहिती देण्यास झ ालेल्या १० दिवसांच्या विलंबाबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.भारत दिगंबर मोहिते याना रूपये २५००/- शास्ती करण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.भारत दिगंबर मोहिते यांच्या जून २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या मे २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण/विकास योजना, झोन क्र.२, पुणे

महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी करावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रशांत जयवंत जोशी
.१२०/१०, आपटे रोड, पुणे-४१००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड नं.१, घोले रोड,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रशांत जयवंत जोशी
. १२०/१०, आपटे रोड, पुणे-४१००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड नं.१, घोले रोड,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे

**जन माहिती अधिकारी** तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.चंद्रकांत गणेश गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : 'मणिकांचन' बंगल्याच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यानी उत्तरही दिले नाही. जी कागदपत्रे देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले, ती संचिकेतच नाहीत. संचिकेत नसणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कसे दिले? जन माहिती अधिकारी श्रीमती मीरा सबनीस कोणतीही माहिती कधीही देत नाहीत. अवलोकन करतो तेव्हा संचिकेत नसलेली कागदपत्रे नंतर संचिकेत लावली जातात. राजकीय दबावामुळे खरी माहिती दिली जात नाही. या सर्व प्रकारामुळे एकाच विषयाच्या संदर्भात वीस अपिले करणे मला भाग पडले आहे.

जन माहिती अधिकारी : तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी श्री.दोशी यांच्या दि.१९.५.२०१० च्या अर्जाला दि.५.७.२०१० च्या पत्रान्वये यूपीसीने उत्तर पाठविले. दोन मुद्दयांबाबतच्या स्पष्टीकरणासाठी विधी सल्लागारांचा सल्ला घेऊन माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले होते. त्यानुसार विधी सल्लागार कार्यालयाने उत्तर दिले.

अपिलीय प्राधिकारी : श्री.दोशी यानी माझ्याकडे २१ अपिले दाखल केली आहेत. संपूर्ण प्रकरणाची संचिका वेळोवेळी त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करून दिली. तरीही पुनः पुन्हा अर्ज, अपिले, तक्रारी, पत्रव्यवहार करून अधिकाऱ्यांना ते वेठीस धरत आहेत. संचिकेतील कागदपत्रांबाबतचे त्यांचे निवेदन पूर्णतः खोटे आहे. केव्हाही येऊन संचिका पाहून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते घेऊ शकतात.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी स्पष्टीकरण, खुलासा, अभिप्राय अशा स्वरूपाची विचारणा बहुसंख्य मुद्दयांमध्ये केली आहे, असे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत. मात्र या अर्जाला तीस दिवसांच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी उत्तर देणे बंधनकारक असताना काहीही कळविलेले नाही. १७ दिवस विलंबाने त्यानी उत्तर दिले आहे. याबाबतचा खुलासा तत्कालीन जन

माहिती अधिकारी श्रीमती मीरा सबनीस यानी तीन दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३.३.२०११ च्या पत्रान्वये श्रीमती सबनीस यानी खुलासा सादर केला. कामाचा ताण, श्री.दोशी यांच्या अर्जांचे प्रमाण व माहिती अधिकाराच्या कक्षेत न येणारे प्रश्न यामुळे उत्तराला विलंब झाल्याचे त्यानी खुलाशात म्हटले आहे. ही कारणे समर्थनीय नाहीत. त्यामुळे त्या शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती मीरा सबनीस यानी माहिती देण्यास झालेल्या १७ दिवसांच्या विलंबासाठी दिलेली कारणे समर्थनीय नसल्याने त्याना रूपये २६७५/- शास्ती करण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्रीमती मीरा सबनीस यांच्या जून २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या मे २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड नं.१, घोले रोड, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी करावी. तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार शास्तीची नोंद घेण्याची कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय कोंडाजी काळे
मु.पो.चास, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर
यांचे कार्यालय, जुन्नर तहसील कार्यालयाजवळ, ता.जुन्नर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, घोडेगाव विभाग, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय कोंडाजी काळे<br>मु.पो.चास, ता.खेड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांचे कार्यालय,<br>जुन्नर तहसील कार्यालयाजवळ, ता.जुन्नर, जि.पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : खाजगी मालकीच्या जागेतील वृक्षतोडीच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणुनबुजून दिली नाही. माझ्या जागेतील सहा झाडे बेकायदेशीरपणे तोडण्यात आली असून त्याबाबत कारवाई केली जात नाही.

अपिलीय प्राधिकारी : तत्कालीन जन माहिती अधिकारी निलंबित आहेत. त्यानी माहिती मुद्देनिहाय दिली असल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते.

विद्यमान जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्यासंदर्भातील कार्यवाहीबाबतचा खुलासा १५ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, घोडेगाव विभाग, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.एस.ए.दराडे यानी दि.८.११.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. श्री.काळे यांचा अर्ज दि.१६.११.२००९ रोजी प्राप्त झाला. शुल्काचे चलन जोडून वनरक्षकामार्फत दि.११.१२.२००९ रोजी श्री.काळे यांच्याकडे पाठविण्यात आले. परंतु त्यानी ते स्वीकारले नाही. म्हणून त्यांच्या सांगण्यानुसार दि.१८.१२.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने पत्र व चलन त्याना पाठविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दि.११.२.२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. माहिती मोफत मिळण्याच्या उद्देशानेच श्री.काळे यानी पत्र व चलन स्वीकारण्यास टाळाटाळ केली, म्हणून विलंब झाला आहे, असे या खुलाशात म्हटले आहे. ते लक्षात घेता विलंबाबाबतची अपीलकर्त्याची तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप गोपाळराव माणगांवकर
८/१२, गांधी चौक, इचलकरंजी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय,
कसबा बावडा रोड, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप गोपाळराव माणगांवकर
८/१२, गांधी चौक, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय,
कसबा बावडा रोड, कोल्हापूर तत्कालीन श्री.संजय दत्तात्रय येनपुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ऑगस्ट २००८ मध्ये गणेशोत्सव तसेच मिरजदंगली नंतर पोलिसांच्या मदतीसाठी इचलकरंजीमध्ये नेमलेल्या 'पोलिस मित्रां'ची नावे व अन्य माहिती जन माहिती अधिकारी यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ अंतर्गत संबंधितांचे जिवित व सुरक्षितता धोक्यात येण्याचे कारण नमूद करुन नाकारली. 'पोलिस मित्र' या सार्वजनिक व्यक्ती असल्याने व जाहीर कार्यक्रमात त्याना प्रशस्तीपत्रके दिली असल्यामुळे ही माहिती नाकारता कामा नये. स्मरणपत्र पाठवूनही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही.

अपिलीय प्राधिकारी - सरसकट सर्व पोलिस मित्रांबद्दल अपीलकर्ता यानी माहिती विचारली आहे. दंगलीनंतरच्या काळात पोलिस मित्रांनी चांगले काम केले होते. त्यांच्याबाबतची माहिती दिली तर पोलिसांना नागरिकांकडून खबर मिळण्यावर परिणाम होईल. तसेच गुन्हेगारांबाबतची माहिती देणाऱ्याचे नाव उघड झाल्यास त्यांच्या जिविताला धोका होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीबाबतची माहिती देता येईल, परंतु सरसकट सर्वांबाबतची माहिती देणे सार्वजनिक सुरक्षिततेच्या कामाच्या दृष्टीने हिताचे होणार नाही.

पोलिस मित्रांना जाहीर कार्यक्रमांत प्रशस्तीपत्रके व समाजातील वापरासाठी ओळखपत्रे देण्यात आली असल्यामुळे अशा व्यक्तींची ओळख गोपनीय असल्याचे म्हणता येणार नाही. तसेच या पार्श्वभूमीवर केवळ त्यांची नावे अपीलकर्त्यास/नागरिकांना देण्यामुळे त्यांच्या जिविताला धोका निर्माण होईल, असे मानता येणार नाही. कोणी कोणती माहिती दिली ही बाब उघड करणे अपेक्षित व योग्यही नाही व अपीलकर्त्यांची ती मागणीही नाही. परंतु 'पोलिस मित्र'म्हणून समाजातील कोणत्या व्यक्तींना निवडण्यात आले आहे, हे नागरिकांना कळणे पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. मात्र अशा व्यक्तींचे निवासी पत्ते, वर्तणुकीचे दाखले, त्याबाबतचे शेरे ही माहिती उघड करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) ऑगस्ट २००८ मध्ये इचलकरंजी येथे 'पोलिस मित्र'म्हणून नेमलेल्या व्यक्तींची नावे जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास पुरवून अनुपालन अहवाल दि.१५.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर अनंत कुलकर्णी
११६, किल्ला विभाग, करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता/कर वसूली निरीक्षक,
करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शंकर अनंत कुलकर्णी
११६, किल्ला विभाग, करमाळा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर श्री. र. सु. कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता,
(बांधकाम विभाग) करमाळा नगरपरिषद, करमाळा,
जि. सोलापूर श्री. कृष्णा उध्दव परबत

**जन माहिती अधिकारी** तथा कर वसूली निरीक्षक,

| | |
|---|---|
| | करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर श्री. संजय वा. ढोके |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - शॉपिंग सेंटरच्या बांधकामाबाबतची माहिती १६ दिवस विलंबाने, अपुरी व वस्तुस्थितीशी विसंगत अशी दिली. नगर परिषदेच्या ठरावात 'लोखंडी टपऱ्या' असा उल्लेख असताना त्या जागी पक्के बांधकाम केलेले आहे. दर चार वर्षांनी होणारी फेर तपासणी केलेली नाही. अशा प्रकारच्या अनेक अनियमितता आहेत. त्याबद्दल कारवाई होणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी- श्री. कुलकर्णी यांच्या दि. १९.६.२०१० च्या अर्जाला दि. १२.७.२०१० रोजी उत्तर देऊन शुल्क कळविले. तसेच कर वसुली विभागाकडील माहिती देण्यासाठी १५ दिवसांच्या मुदतीवाढीची विनंती केली व त्यानुसार ऊर्वरित माहिती दिली. कोणतीही माहिती द्यावयाची राहिलेली नाही. उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत खुलासाही दिला. शॉपिंग सेंटरबाबत त्याच त्याच स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज शब्दरचना बदलून श्री. कुलकर्णी वेळोवेळी करीत असतात. 'या शॉपिंग सेंटरचे काम चालू करतेवेळी नगर परिषदेने जागा मोजणीसाठी नगर भू मापन कार्यालयाकडे अर्ज केला नव्हता. त्यामुळे मोजणी न झाल्यामुळे मोजणीचा नकाशा व उतारा नगर परिषदेकडे उपलब्ध नाही', असे लेखी, तोंडी व अभिलेख दाखवून स्पष्ट करुनही त्याच कागदपत्रांची मागणी ते करीत असतात. याच विषयातील त्यांचे अपील क्र. १११४/सोलापूर व १२००/२००९/सोलापूर ही अपिले आयोगाने यापूर्वी निकाली काढली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास मुद्देनिहाय माहिती मुदतीत देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. नसलेल्या कागदपत्रांची मागणी वारंवार करण्याची अपीलकर्त्यांची कृती

योग्य नाही. प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे त्यांचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. राजश्री अरुण कांबळे
व्दारा रेखा हरिश्चंद्र कांबळे, अपीलकर्ता
'पार्वती' पुजारी प्लॉट नं. ६ विश्रामबाग, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियर, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियर, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१९/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. राजश्री अरुण कांबळे
व्दारा रेखा हरिश्चंद्र कांबळे,
'पार्वती' पुजारी प्लॉट नं. ६ विश्रामबाग, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियर,
विश्रामबाग, सांगली डॉ. श्रीरंग पांडुरंग चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्त्या</u> - लेखा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची कर्तव्ये व त्या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. तसेच हव्या असलेल्या लेखा तपासणी अहवालाच्या प्रतीही मिळाल्या नाहीत.

<u>जन माहिती अधिकारी</u>- सौ. कांबळे यांच्या अर्जावर मुद्देनिहाय उत्तर दिले. दोन लिपिकांच्या संदर्भात आरोपाच्या अनुषंगाने चौकशी चालू असल्यामुळे माहिती दिली नव्हती. ती आरोपपत्र दाखल झाल्यानंतर दिली. त्यानी मागणी केलेल्या नियमित व विशेष लेखा तपासणी अहवालाच्या प्रती दिल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी कर्मचारी/अधिकारी यांच्या सर्वसाधारण कर्तव्यांच्या माहितीबरोबरच खुलासा, अभिप्राय, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणाही (उदा. मुद्या क्र. ४, १०, ११, १३) केली आहे. जन माहिती अधिकारी यानी मुद्देनिहाय उत्तर व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार स्पष्टीकरणात्मक उत्तरही दिल्याचे दिसते. अपिलादरम्यान त्यानी सन २००७-०८ व २००८-०९ च्या लेखातपासणी अहवालांच्या प्रतींची अतिरिक्त (मूळ अर्जात नसलेली) मागणी केली. वस्तुतः मूळ अर्जाव्यतिरिक्तच्या माहितीची मागणी अर्जात करणे नियमानुसार योग्य नाही. तथापि या प्रती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास ३ दिवसांत पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्त्या सौ. राजश्री अरुण कांबळे यानी आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी यानी त्यानी दि. १८.११.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांना या प्रती निःशुल्क पाठविल्याचे त्याना त्याबाबत स्मरण व समज दिल्यानंतर दि. २.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला अवगत केले. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार पूर्तता न केल्याबद्दल व पूर्ततेनंतर तत्परतेने अहवाल न सादर केल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विश्रामबाग, सांगली डॉ. श्रीरंग पांडुरंग

चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, वालचंद  कॉलेज ऑफ इंजिनिअर, विश्रामबाग, सांगली डॉ. डी. वाय. जोशी यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जयवंत शामराव पाटील
मु. पो. बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६१/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जयवंत शामराव पाटील
मु. पो. बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली श्री. विवेक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली श्री. एम.एम.संदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - लोकशाही दिनामध्ये सादर केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. परंतु हा अर्जच मिळाला नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले. कृष्णा नदीच्या महापुरात नुकसान न झालेल्यांनाही भरपाई मिळाली. परंतु आमचे पिक पूर्ण नष्ट होऊनही भरपाई मिळालेली नाही. याबाबत केलेल्या अर्जाची व स्मरणपत्राचीही पोहोच माझ याकडे आहे.

अपीलकर्ता यानी अर्जाची पोहच असलेल्या प्रती सादर केल्या.

जन माहिती अधिकारी- श्री. पाटील यांच्या मूळ अर्जाची नोंद आमच्या कार्यालयार्कडे नाही. सर्व शोध घेऊनच अर्ज आढळत नसल्याचा अहवाल लिपिकानी दिला. अपीलकर्त्यांनी सादर केलेल्या पोहच पत्रावर कार्यालयाचा शिक्का नाही.

अपिलीय प्राधिकारी- सन २००६ च्या पुरातील नुकसानीबाबतचा हा विषय कृषी खात्याच्या अखत्यारीतील आहे.

अपीलकर्त्यांनी लोकशाही दिनातील मूळ अर्जाची प्रत अपिलीय प्राधिकारी याना सादर करावी व त्यानी संबंधित माहिती देण्याबाबत कृषी खात्याला कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु आपल्या मूळ अर्जावर कोणतीच दैनंदिन प्रगती झाली नसावी, म्हणून अधिकारी माहिती देत नसावे. त्याबद्दल त्याना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. पाटील यानी दि. ३०.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र वारंवार मागणी करुनही श्री. पाटील यानी मूळ अर्जाची प्रत दिलेली नाही व देण्यास ते तयार नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली श्री. एम.एम.संदे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली श्री. विवेक जाधव यांनी दि. १८.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले. तसेच श्री. पाटील याना नुकसानीबाबत दिलेल्या मदतीची माहिती सादर करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यानी तालुका कृषी अधिकारी, वाळवा याना दि. ४.११.२०१० रोजी पाठविलेल्या पत्राची प्रतही त्यांनी सादर केली. तक्रारीवर कार्यवाही न

केल्याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच त्यानी मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांना सादर करणे आवश्यक होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. संजय पांडुरंग गोरे
श्रीनाथ चौक, विनोद हार्डवेअर शेजारी,
माळशिरस, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज.व.निकम<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

महाड-पंढरपूर महामार्गासाठी 'एकूण मोकळी शासन मालकीची जागा किती आहे' ही माहिती मूळ अभिलेखाच्या कायदेशीर स्केल परिमाणासह देण्याची मागणी वारंवार करुनही ती नेमकी माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. संजय पांडुरंग गोरे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व पत्रव्यवहारात केली आहे.

डॉ. गोरे यानी या रस्त्याबाबतच्या मोजणीच्या अनुषंगाने वेळोवेळी अर्ज केले असून त्या त्या वेळी माहिती दिली आहे. नकाशासह नकला त्याना पुरविण्यात आल्या असून अन्वयार्थाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. नकाशाला स्केल असते. त्यामुळे वेगळे स्पष्टीकरण देणे आवश्यक नाही. डॉ. गोरे स्वतः कधीही अभिलेख अवलोकनासाठी वा सुनावणीसाठी येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज. व. निकम यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज. व. निकम यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही रास्त आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आबा दशरथ गुजले
मु. पो. बाराळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मंगळवेढा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
बोराळे वि.का.से.सहकारी संस्था मर्या. बोराळे
ता. मंगळवेढा जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

प्रस्तुत अपिलाच्या दि. २८/१०/२०१० रोजीच्या सुनावणीला जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकर्त्यांचे दि. १६.११.२००९ च्या अर्जानुसार मुद्देनिहाय उत्तर दि. १४.१२.२००९ च्या पत्रान्वये दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, बोराळे वि.का.से.सहकारी संस्था मर्या. बोराळे ता. मंगळवेढा जि. सोलापूर यानी लेखी निवेदनाद्वारे कळविले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी नेमकेपणाने माहितीची मागणी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिनानाथ जनार्दन डोंगरे
कृतार्थ, प्लॉट नं. ५५, गव्हर्नमेंट कॉलनी,
विश्रामबाग, सांगली                अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, सेवागृह इमारत,
मार्केट यार्ड, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, कुपवाड, सांगली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९५/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दिनानाथ जनार्दन डोंगरे
कृतार्थ, प्लॉट नं. ५५, गव्हर्नमेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, सेवागृह इमारत,
मार्केट यार्ड, सांगली श्री. एम.एम.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,

| | |
|---|---|
| | नगर भूमापन अधिकारी कार्यालय, कुपवाड, सांगली श्री. व.स.निकम |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - राज्य सरकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था, सांगली या संस्थेतील दोन धारक सदरातून कमी करुन भूखंडांबाबत मिळकत पत्रिकेला माझ्यासह दोन संबंधित धारकांची नावे इतर हक्कातून कमी करुन कब्जेदार सदरी व सोसायटीचे नाव इतर हक्कात दाखल करावे, अशी मागणी वारंवार करुनही कार्यवाही केली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार माहितीच्या अधिकारात कार्यवाही करता येणार नाही. त्यासाठी नियमानुसार स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागेल, याची कल्पना त्याना दिली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अमोल ज्योती कुंभार
मु. पो. तावशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३७/२००९/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.अमोल ज्योती कुंभार
मु. पो. तावशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी
श्री. आनंदा मारुती शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर
श्री. ज्ञानोबा शंकरराव बिलापटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- रस्त्याच्या कामासंदर्भातील माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी आल्यानंतर शुल्क भरण्यास सांगितले.

जन माहिती अधिकारी- श्री कुंभार यांच्या दि. २४.४.२००९ च्या अर्जाला दि. ८.५.२००९ च्या पत्रान्वये उत्तर देऊन अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले. दि. १६.६.२००९ रोजी ते उपस्थित राहिले, तेव्हा त्याना शुल्क सांगण्यात आले. दि. ८.७.२००९ रोजी स्मरणपत्र पाठविले. दि. ४.९.२००९ रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर दि. १८.९.२००९ च्या पत्रान्वये काही माहिती पाठवून दिली व काही माहिती समक्ष दिली. त्यावेळी रत्याचे काम पूर्ण झालेले नव्हते, असेही अपीलकर्त्यास स्पष्ट केले. कामाच्या संदर्भातील ऊर्वरित माहिती अपीलकर्त्यास रजिस्टर्ड टपालाने पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ३१.१०.२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आल्याचे श्री. कुंभार यांच्या पोहोच पावतीसह जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. ज्ञानोबा शंकरराव बिलापटे यानी दि. ४.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. माहिती दिल्यानंतर त्वरित अहवाल सादर न केल्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. ज्ञानोबा शंकरराव बिलापट याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रकाश बंडोपंत बापट
यश रेसिडन्सी, विकास चौक, **अपीलकर्ता**
दत्त मंदिराजवळ, दक्षिण शिवाजीनगर,
सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
इस्लामपूर, जि.सांगली

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (संवसु),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
इस्लामपूर, जि.सांगली

**२.जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,
आष्टा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जोडपत्र 'अ' ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

आपल्या जागेत अन्य व्यक्तीस दिलेल्या वीज कनेक्शनबाबतच्या अहवालाची खोटी प्रत व माहिती उशिरा दिल्याबाबतची तक्रार अपीलकर्ता श्री.प्रकाश बंडोपंत बापट यानी केली. श्री.बापट यानी

वीज कनेक्शन दिल्याबाबतची तक्रार सहा वर्षांनंतर केली असून वीज कनेक्शन तोडावे, अशी मागणी केली आहे. सध्या या दोन्ही मिळकतीबाबत न्यायालयात वाद सुरु असून या प्रकरणी न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. कार्यकारी अभियंत्यांनी जागेची पाहणी करुन नगर भूमापन विभागाला अहवाल देण्याबाबत कळविले असून त्यानी अद्यापही अहवाल दिलेला नाही. अपीलकर्त्यास यापूर्वी वेळोवेळी या संदर्भात माहिती दिली असून ते एकाच विषयावर ते सातत्याने पुन्हा पुन्हा तीच माहिती मागत असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (संवसु), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, इस्लामपूर, जि.सांगली श्री.एस.के.नेगलुर यानी सांगितले.

श्री.बापट यांच्या दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी झालेल्या याच विषयाबाबतचे अन्य अपील (अपील क्र.४१३/२००९/सांगली) हे आयोगाच्या दि.२८.१०.२०१० च्या आदेशान्वये अमान्य करण्यात आले आहे. तोच निर्णय प्रस्तुत अपिलातही लागू होतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अनिल वामनराव देसाई
सर्व्हे नं.१४/१, जयजवान नगर, **अपीलकर्ता**
श्रीकृष्ण मंदिराजवळ, येरवडा,
पुणे-४११ ००६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (पुनर्वसन),**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (पुनर्वसन),**<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-४११ ००१ श्रीमती शुभांगी फुले<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,**<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-४११ ००१<br>श्री.प्रशांत शेळके | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे हिंजवडी, ता.मुळशी येथील सर्व्हे नं.१२१ ते १२६ च्या संपादनासंदर्भात |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अनिल वामनराव देसाई यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२९.१२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली . अपीलकर्ता श्री.देसाई हे दि.१९.१०.२०१० रोजी मयत झाले असल्याची बाब जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी फुले यानी श्री.देसाई यांच्या मृत्यू प्रमाणपत्रासह आयोगाच्या निर्दशनास आणून दिली. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विजय नरसिंग माळगे
२५२-ए, पर्वती पायथा, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
येरवडा मध्यवर्ती कारागृह,
येरवडा, पुणे-४११ ००६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक,**
येरवडा मध्यवर्ती कारागृह,
येरवडा, पुणे-४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.विजय नरसिंग माळगे<br>२५२-ए, पर्वती पायथा,<br>पुणे-४११ ०३०<br>**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक,**<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह,<br>येरवडा, पुणे-४११ ००६ श्री.सुधीर किंगरे | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शिक्षा बंदी क्र.बी-३५५९० श्री.विकास रमेश पटेकर हे शिक्षा भोगून केव्हा मुक्त होणार आहेत याबाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विजय नरसिंग माळगे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.८.४.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला सर्व माहिती मिळाली आहे. माझी काही तक्रार नाही. तरी अपील निकाली काढण्यात यावे', अशी अपीलकर्ता श्री.माळगे यांची पोहोच जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे श्री.सुधीर किंगरे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. राजीव आ. लाले
२९२, लाले बंगला, महावीरनगर,
सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
भैरवनाथ जीवन विकास संस्था, ऐतवडे खुर्द,
ता. वाळवा. जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५५/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** ॲड. राजीव आ. लाले
२९२, लाले बंगला, महावीरनगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग
सांगली यांचे प्रतिनिधी श्री. नागेश भिमाशंकर वैचबाळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री भैरवनाथ जीवन विकास संस्था, ऐतवडे खुर्द, ता. वाळवा या संस्थेकडून संस्थेच्या नियोजित आयुर्वेद महाविद्यालयाबाबतची माहित न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता ॲड. राजीव आ. लाले यानी केली.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांच्या दि. २०.१२.२००७ च्या अर्जाला अध्यक्ष श्री. रघुनाथ शंकर पाटील यानी दि. १५.१.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार उपरोक्त संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता ॲड. लाले यानी सादर केलेले नाहीत. त्याबाबतचे लेखी निवेदन सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अपीलकर्ता ॲड. लाले यानी असे निवेदन अद्याप सादर केलेले नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत नारायण सोमा
४४०-बी, कर्णिकनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, पूर्व विभाग, सार्वजनिक वाचनालय,
शनिवार पेठ कन्ना चौक, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, पूर्व विभाग, सार्वजनिक वाचनालय,
शनिवार पेठ कन्ना चौक, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.वसंत नारायण सोमा यानी माहितीच्या अधिकाराखाली अनेक अर्ज केले असून त्या त्या वेळी विहित मुदतीत त्याना माहिती देण्यात आली. वाचनालयाच्या कार्यकारी

मंडळाचे ते सदस्य असून कोणतीही माहिती नाकारलेली नाही. तसेच कोणतेही अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचेही वेळोवळी कळविले. परंतु एकदाही अभिलेख अवलोकनासाठी ते उपस्थित राहिले नाहीत, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, पूर्व विभाग, सार्वजनिक वाचनालय, शनिवार पेठ कन्ना चौक, सोलापूर श्री.नारायण सी.पुजारी व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, पूर्व विभाग, सार्वजनिक वाचनालय, शनिवार पेठ कन्ना चौक, सोलापूर श्री.लक्ष्मीनारायण गं.कुचन यानी सादर केले.

श्री.सोमा याना वेळोवेळी दिलेल्या माहितीच्या व त्याविषयीच्या जावक बारनिशीतील नोंदीच्या प्रती त्यानी सादर केल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती बाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**28 APR 2011**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मिलिंद श्रीधर पोहरे
मु.पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मिलिंद श्रीधर पोहरे
मु.पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं.फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पुनर्वसनाच्या जमिनीबाबतची सन १९८४ ते १९९० या काळातील माहिती मागितली होती. परंतु अद्याप माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची संचिका प्राप्त करून घेऊन अहवाल सादर करण्यात येईल.

विहित मुदतीत माहिती दिली नसल्यास तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांचा लेखी खुलासाही अपिलीय प्राधिकारी यानी प्राप्त करून घेऊन सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार संबंधित प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत पुरविल्याचे, तसेच मूळ तक्रारीबाबत तहसीलदार, आंबेगांव यानी दिलेल्या निर्णयाची प्रतही अपीलकर्त्यास पाठविल्याचे संचिकेतील कागदपत्रांवरून स्पष्ट होते, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके यानी दि.२३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. तो लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 APR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंदन किसनराव सोंडेकर
मौजे पिंपळे जगताप, पो.करंदी, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंदन किसनराव सोंडेकर
मौजे पिंपळे जगताप, पो.करंदी, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणेप्रतिनिधी श्री.उदय भोसले

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.उदय भोसले श्री.संजय शिंदे, श्री.ऋषीकेत शेळके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कृषी उत्पन्न बाजार समितीला दिलेल्या जागेतील बांधकाम, आरक्षित भूखंडांचे वाटप इ. बाबत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती / कारवाईचा अहवाल मागितला होता. जिल्हाधिकारी कार्यालयाने अर्ज तहसीलदार, शिरूर यांच्याकडे वर्ग केला व त्यानी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून माहिती घेण्यास कळविले. १५० शेतकऱ्यांची यामध्ये फसवणूक झाली असून त्यामुळे चौकशी होऊन कारवाई होणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : आमच्या कार्यालयाकडील माहिती अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिली. ऊर्वरित माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती, शिरूर यांच्याकडील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे पाठविला. मूळ प्रकरणातील तक्रारीबाबत त्यांच्याकडून काहीही कळविले गेले नाही. त्यामुळे पुढील कारवाईबाबत अपीलकर्त्यास काहीही कळविता आले नाही. या पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या.

अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : कारवाईसाठी मूळ अर्ज तहसीलदार, शिरूर यांच्याकडे पाठविला. जमीन बाजार समितीला दिलेली असल्यामुळे त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर

कारवाई केली जाईल, असे तहसीलदार, शिरूर यानी स्पष्ट केले. या संदर्भातील अपील पणन महासंघाकडे करणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून संबंधित प्रकरणी १५ दिवसांत अहवाल प्राप्त करून घेऊन त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून अहवाल प्राप्त करून घेण्यात आला. दि.११.१.२०११ च्या पत्रान्वये समितीने दिलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पुरविल्याचे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.उदय भोसले यानी दि.३१.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
28 APR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धोंडीराम दत्तात्रय माळी
मु. पो. कळमण, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उप जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक/चिटणीस
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४६/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक/चिटणीस जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. ए.एस.शेटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. धोंडीराम दत्तात्रय माळी यांचा मूळ अर्ज उपलब्ध होत नव्हता. प्रथम अपील दाखल झाल्यावर २ पत्रे पाठवून तसे त्याना कळविले व अर्जाची प्रत मागितली. परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान मूळ अर्ज सापडला असून त्यातील विषय जिल्हा परिषदेशी संबंधित आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक/चिटणीस जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. ए. एस. शेटे यानी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुक्ताराम सुभाजी पवार
मु.म्हसे बु., पो.टाकळीहाजी, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय,
महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.मुक्ताराम सुभाजी पवार<br>मु.म्हसे बु., पो.टाकळीहाजी, ता.शिरूर, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.संजय गोपाळ शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : १७ एकर शासकीय जमीन स्थानिक व्यक्ती व शासकीय अधिकारी यांनी संगनमताने बळकावली आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यावरील कार्यवाहीची माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जातील मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असल्यामुळे तो अर्ज उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याचे १५ दिवसांत त्याना कळविले. पुढील कार्यवाही ही त्यांच्या कक्षेतील बाब आहे.

अपीलकर्त्याची मूळ तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. तथापि त्याबाबत केलेल्या पुढील कार्यवाहीबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ, जि.पुणे यानी आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार निवासी नायब तहसीलदार, शिरूर यानी संबंधित प्रकरणातील दि.१९.८.२०१० च्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पाठविल्याचे दि.२२.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिलेल्या मुदतीत सादर करण्याची समज निवासी नायब तहसीलदार, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे व तहसीलदार, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक परशुराम शिंदे
१२९, बुधवार पेठख मिलिंदनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिपक परशुराम शिंदे
१२९, बुधवार पेठ, मिलिंदनगर, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री.अ.बा.साळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री.अ.बा.साळे यानी पदभार स्वीकारल्यापासून काढलेल्या निविदा, कामांची मोजमाप पुस्तके इ.बाबतची माहिती मागितली होती. हीच माहिती अन्य अर्जदाराने मागितली असता ४२४८ प्रतींसाठी ८४९६ रूपये शुल्क कळविले. मी दारिद्र्यरेषेखाली असूनही जन माहिती अधिकारी यानी १४९४५ पृष्ठे होत असून रूपये २९८९० इतके शुल्क भरण्यास, तसेच १०० रूपयांपर्यंतची माहिती निःशुल्क मिळेल, असे कळविले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना माहिती निःशुल्क मिळाली पाहिजे. अपिलीय प्राधिकारी यानी निःशुल्क माहिती देण्याचे तोंडी सांगूनही कार्यकारी अभियंता यानी केवळ १४७८ पृष्ठांच्या प्रती दिल्या. ऊर्वरित माहिती मिळाली नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यांचा अर्ज दि.१.७.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला दि.२०.७.२०१० रोजी उत्तर दिले. १०० रूपयांपर्यंतची माहिती निःशुल्क देण्याचे परिपत्रक जलसंपदा विभागातर्फे काढण्यात आले असून त्यानुसार उत्तर दिले. श्री.शिंदे यानी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून सर्व कागदपत्रांचा आढावा घेऊन शुल्क कळविले. त्यानी संदर्भ दिलेल्या अन्य अर्जापेक्षा प्रती जास्त आहेत. सुमारे १५००० पृष्ठांच्या प्रती निःशुल्क देणे शक्य नसल्यामुळे अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबतही कळविले.

अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली आहे. अन्य अर्जदारानी मागितलेल्या त्याच माहितीसाठी त्याना कळविलेले शुल्क व श्री.शिंदे याना कळविलेले शुल्क यात तफावत आहे. अशा तफावतीचे समाधानकारक स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी करू शकले नाहीत. ही बाब गंभीर आहे. त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे. अपीलकर्ता संबंधित अभिलेखांचे अवलोकन करून पृष्ठसंख्येबाबत खात्री करून घेऊ शकतात. माहितीचे प्रमाण व छायांकित प्रतीसाठीच्या निधीबाबतचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री.अ.बा.साळे यांचे निवेदन लक्षात घेता अपीलकर्त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करावे व

२०० पृष्ठांपर्यंतची माहिती जन माहिती अधिकारी यानी त्याना निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :-  २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष सोमा बाणेकर
मु.पो.लवळे, ता.मुळशी, जि.पुणे-४११०४२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
मुळशी (पौड), ता.मुळशी, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लवळे,
ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संतोष सोमा बाणेकर
मु.पो.लवळे, ता.मुळशी, जि.पुणे-४११०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुळशी (पौड),
ता.मुळशी, जि.पुणे श्री.गणेश पांडुरंग शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लवळे,
ता.मुळशी, जि.पुणे श्री.शिवाजी सुभेदार खलाटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.संतोष सोमा बाणेकर यानी दि.२८.५.२०१० व १०.६.२०१० रोजी दिलेल्या अर्जानुसार माहिती देण्यात आली असल्याचे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लवळे, ता.मुळशी, जि.पुणे श्री.शिवाजी सुभेदार खलाटे यानी केले. आपल्या तीन अर्जानुसार माहिती मिळाली असून अपील निकाली काढण्यास हरकत नसल्याच्या अपीलकर्त्याच्या लेखी निवेदनाची प्रत त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुमेरसिंग रामसिंग राजपूत
३१६, स्वामी विवेकानंद नगर, अपीलकर्ता
मजरेवाडी, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक नगर रचना,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुमेरसिंग रामसिंग राजपूत
३१६, स्वामी विवेकानंद नगर, मजरेवाडी, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक नगर रचना,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सुनील जगन्नाथ सदामते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मी रहात असलेल्या इमारतीतील माझ्या फ्लॅटवरील गच्चीमध्ये मोबाईल टॉवर उभारला गेला आहे. त्याबाबतची परिपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी देत नाहीत. शुल्क भरुन करारनाम्याची प्रत देण्यात आली व संचिका दाखविण्यात आली. त्यात नकाशावर नेमकी मापे नोंदविलेली नाहीत. या टॉवरला परवानगी दिली नसल्याचे उत्तर त्यानी दिले आहे. तसेच टॉवरमुळे पावसाचे पाणी आमच्या घरात येते. या सर्व बाबतीत कारवाई करणे आवश्यक असूनही केली जात नाही. या अनुषंगाने मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी- श्री. राजपूत यांच्या दि. २.३.२०१० च्या अर्जाला दि. ३१.३.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. उपलब्ध माहिती देऊन कागदपत्रांच्या प्रतींसाठीचे शुल्क कळविले. परवानगी न घेता टॉवरची उभारणी केली आहे. मात्र मुद्दा क्र. ३ ,४ व ५ मध्ये अपीलकर्त्यांनी केलेल्या विचारणीनुसार तपासणी/ पाहणी झालेली नसून तसेही उत्तर दिले आहे. तपासणी करुन कारवाई करण्याची त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सुनील जगन्नाथ सदामते यानी अपीलकर्त्यांच्या अर्जास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. मुद्दा क्र. ३,४ मधील (सी) ४, ५ मध्ये विचारलेल्या प्रश्नांनाही जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले असून अपीलकर्त्यांची तक्रार प्रशासकीय कार्यवाहीबद्दलची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. तथापि बेकायदेशीर टॉवर उभारणीबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. तसा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सुनील जगन्नाथ सदामते यानी द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे .

२. विनापरवाना टॉवर उभारणीबाबत केलेल्या कारवाईची माहिती देण्याबाबत आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सुनील जगन्नाथ सदामते यानी विलंबाच्या कारणांसह दि. २०.५.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा. अपीलकर्त्यास त्याची प्रत पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी आबाजी गाडे
३७१ अ, रविवार पेठ, मु. पो. ता. फलटण,
जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
सातारा, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,
न.पा.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८६/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. संभाजी आबाजी गाडे
३७१ अ, रविवार पेठ, मु. पो. ता. फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
सातारा, जि. सातारा श्री. सोनाप्पा यमगर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,
न.पा.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती दीपा हरी बापट

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - फलटण नगर परिषदेने रस्त्याच्या कामावर सुमारे २५ लाख खर्चास मंजूरी दिली असून प्रत्यक्षात हा रस्ता नगर परिषदेच्या मालकी वहिवाटीचा नाही. मुख्याधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे या रस्त्यावर ११ लाख ५० हजार रुपये खर्च केला. त्याबद्दल त्यांच्यावर कडक कारवाई करुन रक्कम वसूल करण्याची मागणी दि. २१.७.२००८ च्या अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केली होती. या अर्जाबाबत निर्णय होऊन माझे काम कधी होईल, अशी विचारणा माहितीच्या अधिकारात केली होती. मूळ अर्जाची चौकशी झाली नाही. भ्रष्टाचार झाला असून खर्चाची वसुली संबंधित अधिकाऱ्यांकडून केली पाहिजे. परंतु कोणतीही कारवाई केली जात नाही व माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u>- अपीलकर्ता सातत्याने हा विषय मांडत असून संबंधित प्रकरणात कारवाई झालेली नसल्यामुळे तशी माहिती देता आली नाही. अपीलकर्त्यास वेळोवेळी त्याबाबत समक्ष कल्पना दिली. परंतु लेखी स्वरुपात उत्तर दिले नाही. अशी चूक यापुढे होणार नाही. याच विषयासंदर्भात अपीलकर्त्यांचे अपील क्र. १०४/२००९ आयोगाने यापूर्वी निकाली काढले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मूळ तक्रार हा माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच संभाव्य कारवाई/ कार्यवाही, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा उक्त अधिनियमानुसार 'माहिती' ठरत नाही. मात्र अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती देणे, तसेच अर्जदाराला लेखी स्वरुपात उत्तर दिले जाणे बंधनकारक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, न. पा. शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती दीपा हरी बापट व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा, जि. सातारा श्री. सोनाप्पा यमगर यांना देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास संबंधित प्रकरणातील संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, न.पा.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती दीपा हरी बापट यानी दि. २०.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. परशुराम लक्ष्मण करंदीकर
घ. नं. ३००२/ब दत्त मंदिराजवळ, अपीलकर्ता
किर्तन प्रसाद, दत्त बोळ, बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९९/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड श्री. एच. आर. भारती

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. परशुराम लक्ष्मण करंदीकर यानी  कालबाहय झालेल्या प्रवासभत्ता देयकाच्या संदर्भात माहिती मागितली होती. प्रामुख्याने रकमेची परिपूर्ती करण्याची मागणी असून ती  प्रशासकीय कार्यवाहीची आहे. ती ही पूर्ण करण्यात आली. तसेच दरम्यानच्या काळात दि. २५.९.२००९ रोजी अपीलकर्त्यांचे निधन  झाले आहे, असे  निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड श्री. एस. एस. घोडके यानी केले व अपीलकर्त्यांच्या मृत्यू-प्रमाणपत्रासह पूरक कागदपत्रे दि. १६.११.२०१० च्या पत्रान्वये सादर केली. ती लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार बळवंत पोतदार
श्री. शिवाजी भिवा मोकाशी
श्री. मुरलीधर पिराजी शिंदे
रा. निरंकार कॉलनी वारणाली रोड, अपीलकर्ता
विश्रामबाग, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४१/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नंदकुमार बळवंत पोतदार व इतर
रा. निरंकार कॉलनी वारणाली रोड, विश्रामबाग, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वतीने
सौ. एन. एन. लोखंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्रामबाग, सांगली या महाविद्यालयात केलेल्या रोजंदारीवरील सेवेचा कालावधी निवृत्ती वेतनासाठी ग्राहय धरण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही. अपिलाचा निर्णय दिला गेला नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी - सन १९६५ ते १९७५ या कालावधीतील निवृत्ती वेतनाबाबतचा हा विषय आहे. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून घेऊन माहिती देण्यात येत असल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. महाविद्यालयाने दि. १८.३.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार प्रशासकीय कार्यवाही होण्यासाठी अर्ज केला.

अपीलकर्त्यांची मागणी प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. महाविद्यालयाने त्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावासह अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने सौ. एन. एन. लोखंडे यानी सादर केल्या. अपीलकर्त्यास हव्या असल्यास या प्रतींसह अन्य कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्रीमती एस. सी. अत्तार यानी निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. संजय पांडुरंग गोरे
श्रीनाथ चौक, विनोद हार्डवेअर शेजारी,
माळशिरस, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज.व.निकम

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

महाड-पंढरपूर महामार्गासाठी 'एकूण मोकळी शासन मालकीची जागा किती आहे' ही माहिती मूळ अभिलेखाच्या कायदेशीर स्केल परिमाणासह देण्याची मागणी वारंवार करुनही ती नेमकी माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. संजय पांडुरंग गोरे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व पत्रव्यवहारात केली आहे.

डॉ. गोरे यानी या रस्त्याबाबतच्या मोजणीच्या अनुषंगाने वेळोवेळी अर्ज केले असून त्या त्या वेळी माहिती दिली आहे. नकाशासह नकला त्याना पुरविण्यात आल्या असून अन्वयार्थाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. नकाशाला स्केल असते. त्यामुळे वेगळे स्पष्टीकरण देणे आवश्यक नाही. डॉ. गोरे स्वत: कधीही अभिलेख अवलोकनासाठी वा सुनावणीसाठी येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज. व. निकम यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, माळशिरस, जि. सोलापूर श्री. काशिनाथ जगन्नाथ मदने व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर श्री. ज. व. निकम यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही रास्त आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु. महागाव, पो. बावी, ता. बार्शी, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
तहसील कार्यालय, उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७०/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/११/२०१० |

**३. उपस्थित**

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी श्री. एन.एम.मगर

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार (महसूल-I)
तहसील कार्यालय, उस्मानाबाद श्री. राजाभाऊ सोपानराव कदम

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार
तहसील कार्यालय, तुळजापूर यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.बी.शिंगाडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप यानी गावकामगार तलाठयाच्या गोपनीय अहवालाच्या व सेवापुस्तिकेच्या प्रतींची मागणी केली होती. उस्मानाबाद तहसील कार्यालयाकडून तुळजापूर तहसील कार्यालयाला अर्ज वर्ग केला. माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यानी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर यांच्याकडे अपील केले. ८ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर श्री. एस.सी.येवलीकर यानी अपिलकर्त्यास त्याबाबत विलंबाने कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय तुळजापूर श्री. भारत सूर्यवंशी यानी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाचे हस्तांतरण अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांत करणे बंधनकारक आहे. परंतु उस्मानाबाद तहसील कार्यालयाने एक महिन्याने अर्ज हस्तांतरित केला आहे. याबाबत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, महसूल-१, उस्मानाबाद श्री. राजाभाऊ सोपानराव कदम व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद श्री. कृष्णकांत एन. चिकुर्ते याना समज देण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर श्री. एस.सी.येवलीकर यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा १० दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर कार्यालय, तुळजापूर श्री. एस.सी.येवलीकर यानी दि. २०.११.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. संबंधित तलाठयाचे गोपनीय अहवाल तहसील कार्यालयात उपलब्ध नसून सेवापुस्तिका प्राप्त झाली नाही. तसे मूळ अर्जावर शोध घेऊन कळविले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर अभिलेख कक्षात पुनश्च शोध घेण्यात आला व सेवापुस्तिका उपलब्ध होत नसल्यामुळे तसे कळविले. सन १९९२-९३ पासूनच्या अभिलेखांचा शोध घेण्यास लागलेल्या अवधीमुळे विलंब झाला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. येवलीकर यानी खुलाशात नमूद केले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंबादास प्रभाकर जोशी
मु. पो. ता. माढा, जि. शिवाजीनगर माढा,
जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
लातूर, जि. लातूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
लातूर, जि. लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
लातूर, जि. लातूर यांचे प्रतिनिधी श्री. बाबासाहेब गुरुक्षांतप्पा अरबत

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
लातूर, जि. लातूर श्री. लक्ष्मण ईरबा वाघमारे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. सुरेश बाबाराव कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अंबादास प्रभाकर जोशी यानी काही शासन निर्णयांच्या प्रती व खाजगी शाळेतील सेवाशर्ती, रोस्टर आदि संदर्भात २६ मुद्दयांची माहिती दि. ७.१.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दि. ११.१.२०१० रोजी प्राप्त झालेल्या या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर, जि. लातूर श्री. सुरेश बाबाराव कांबळे यानी दि. १५.१.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. संबंधित शासननिर्णय संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे कळविले. ऊर्वरित मुद्दयांमध्ये खुलासा, अभिप्राय अशा स्वरुपाच्या विचारणेचे अनेक प्रश्न होते. त्याचे उत्तर देणे शक्य नव्हते. तरीही संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती व सर्व मुद्दयांची उत्तरे देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिले. त्यानुसार दि. ९.४.२०१० च्या पत्रान्वये पूर्तता केली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर, जि. लातूर श्री. लक्ष्मण ईरबा वाघमारे यानी दिलेल्या माहितीच्या प्रतींसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. खुलासा, अन्वयार्थ, अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा (उदा. मुद्या क्र. १०, १४, १५, १६, १७, १८, इ.) अपीलकर्त्यांनी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वास बाबुराव मुसळे
६५१, सी वॉर्ड, टिपुगडे गल्ली, कळंबा, अपीलकर्ता
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक (प्रशासकीय),
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -**श्री. विश्वास बाबुराव मुसळे
६५१, सी वॉर्ड, टिपुगडे गल्ली, कळंबा,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री. जे.एन.जठार

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक (प्रशासकीय),
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी
श्री. बी. बी. हरणे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयाने रोजंदारी अस्थापनेवरील पदांचे रुपांतरण करण्यासंबंधी शासनाला सन १९८७ ते १९९२ या काळात पाठविलेल्या प्रस्तावांच्या प्रती व त्या अनुषंगाने मागितलेली माहिती देण्यास विलंब लागेल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. मात्र संबंधित लिपिक सेवानिवृत्त झाले व अभिलेखांचा शोध घेऊन संबंधित माहिती जुनी असल्यामुळे प्राप्त झालेली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी यांनी ते ग्राहय ठरवून अपील निकाली काढले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - शोध घेऊनही संबंधित कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. हे कायम स्वरुपी जतनाचे अभिलेख आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संबंधित अभिलेख कायम स्वरुपी जतनाचे असून उपलब्ध होणे आवश्यक आहे. सर्व संबंधितांना त्याबाबत जाणीव देऊन १५ दिवसांत पुनश्च शोध घ्यावा, कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह कारवाई करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित नस्तींचा शोध घेऊन अपीलकर्त्यांना त्या दिनांक ३०.३.२०११ रोजी निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या. निरीक्षण करुन त्यानी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती निःशुल्क देण्यात आल्या. सन १९८७ पासूनची ही कागदपत्रे प्रथम तपासणीत आढळून आली नव्हती. पुनश्च सखोल शोध घेतला असता ती उपलब्ध होऊन अपीलकर्त्यास पुरविण्यात आली, असा अहवाल जन माहिती अधिकारी सौ. ए. व्ही. कोळी यानी दि. ३१.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. कागदपत्रे प्रत्यक्ष पाहून मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती प्राप्त झाल्याच्या अपीलकर्त्याच्या पत्राची प्रतही त्यानी सोबत सादर केली. मूळ अर्जांवरील कार्यवाहीतच कागदपत्रांचा शोध अधिक गांभीर्याने घेतला जाणे आवश्यक असल्याचे या प्रकरणातील कार्यवाहीवरुन

स्पष्ट होते. सर्वच शासकीय कार्यालयांनी याची नोंद घेऊन अभिलेखांच्या शोधाबाबतच्या कार्यपध्दतीत सुधारणा केली पाहिजे, याची जाणीव सर्व संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधाकर नारायण पिसे
भजनी मंडप गल्ली, पेठ वडगांव, अपीलकर्ता
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य निरीक्षक,
वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४९/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुधाकर नारायण पिसे
भजनी मंडप गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक वाठारे

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य निरीक्षक,
वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - कचरा वाहतुकीच्या गाडयांच्या संदर्भात दि. ८.६.२००९ च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही त्यानी माहिती देण्याबाबत कार्यवाही केली नाही. माहिती निःशुल्क मिळावी व १ वर्ष ८ महिने होऊनही माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी.

<u>जन माहिती अधिकारी</u> - श्री. पिसे यानी मागितलेली माहिती देण्यास विलंब लागेल, असे त्याना समक्ष सांगितले होते. याच दरम्यान माझ्या व्दितीय पत्नीची प्रकृती ठीक नव्हती व दि. २१.४.२०१० रोजी तिचे निधन झाले. माझी मानसिक स्थिती ठीक नव्हती . तसेच कागदपत्रे शोधण्यास वेळ लागला. त्यामुळे दि. १५.२.२०११ रोजी माहिती तयार केली व अपीलकर्त्यांना देण्यास गेलो असता त्यानी ती स्वीकारण्यास नकार दिला. कौटुंबिक व आर्थिक संकटामुळे माहिती विहित मुदतीत देण्याचे कर्तव्य मी पार पाडू शकलो नाही. म्हणून विलंब क्षमापित करण्याची विनंती आहे.

<u>अपिलीय प्राधिकारी</u>- श्री. पिसे यांच्या दि. ८.६.२००९ च्या अर्जावर जन माहिती अधिकारी श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यानी कोणतीही कार्यवाही केली नाही. माहिती देण्याचे ओदश दि. २८.९.२००९ रोजी दिले. त्यानंतरही त्यानी माहिती दिली नाही. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल झाल्यानंतर दि. ३.२.२०११ रोजी त्याना नोटीसही दिली. त्यानंतर त्यानी कार्यवाही केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यानी अपीलकर्त्याच्या मूळ अर्जाला विहित मुदतीत उत्तरही दिलेले नाही. दि.८.६.२००९ च्या अर्जानुसार द्यावयाची माहिती त्यानी आयोगापुढे सादर केली असून ती पाहता १ वर्ष ८ महिने इतका कालावधी लागला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराला ३० दिवसात माहिती देणे बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यानी विलंबाबाबत पत्नीचे निधन, आर्थिक व मानसिक स्थिती आदि कारणे दिली आहेत. परंतु मूळ अर्जानंतर

सुमारे १० महिन्यांनी त्यांच्या पत्नीचे निधन झाले आहे व त्यानंतर १० महिन्यांनी त्यानी माहिती तयार केली आहे. त्यांच्या कौंटुबिक अडचणी लक्षात घेतल्या तरी हा विलंब क्षम्य ठरत नाही. ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यानी माहिती देण्यास दीड वर्षांहून अधिक विलंब केला असून त्याना एकूण रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यांच्या जून- २०११, जुलै-२०११, ऑगस्ट- २०११, सप्टेंबर- २०११, आक्टोबर-२०११ च्या अनुक्रमे जुलै-२०११, ऑगस्ट-२०११, सप्टेंबर-२०११ आक्टोबर-२०११, नोव्हेंबर-२०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून पाच हप्त्यांत वसूल करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक वाठारे यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक वाठारे यानी दि. २५.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमजान इस्माईल तांबोळी
गवत्या मारुती चौक मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती, मोहोळ जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८४/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती, मोहोळ जि. सोलापूर श्री.एच.ए.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक ,
पंचायत समिती मोहोळ, जि. सोलापूर श्री. के.एम.नवले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

दोन ग्रामपंचायतींच्या मासिक बैठका, ठराव, जमाखर्च, विकास कामे इ. विस्तृत स्वरुपाची

माहिती अपीलकर्ता श्री. रमजान इस्माईल तांबोळी यानी सरसकट स्वरुपात मागितली होती. सर्व माहिती दिली आहे. अपीलकर्त्यांचे तसे निवेदन सादर करण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यानी केले. 'माहिती मिळाली, माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही', असे अपीलकर्त्यांचे दि. १.११.२०१० चे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक , पंचायत समिती मोहोळ, जि. सोलापूर श्री. के.एम. नवले यानी दि. ४.५.२०११ च्या पत्रासोबत आयोगाला सादर केले. निवेदन सादर करण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पंचायत समिती मोहोळ, जि. सोलापूर श्री. के.एम. नवले याना कडक ताकिद देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. एस.एम.इनामदार
अध्यक्ष, बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन जिल्हा शाखा,
सोलापूर, ६३९, उत्तर सदर बझार, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
पंडित जवाहरलाल नेहरु उर्दू प्रायमरी शाळा,
५२, संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/११/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. एस.एम.इनामदार,<br>अध्यक्ष, बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन जिल्हा शाखा,<br>सोलापूर, ६३९, उत्तर सदर बझार, सोलापूर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

पंडित जवाहरलाल नेहरु उर्दू शाळा, सोलापूर या शाळेला शासनाकडून अनुदान मिळत असूनही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. एस.एम.इनामदार यानी केली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, पंडित जवाहरलाल नेहरु उर्दू प्रायमरी शाळा, ५२, संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर श्रीमती मसरत अब्दुलरशीद शेख यानी अपीलकर्त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले व दि. १६.११.२०१० च्या पत्रान्वये त्याना कळविले. त्यानुसार दि. ९.१२.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका , पंडित जवाहरलाल नेहरु उर्दू प्रायमरी शाळा, ५२, संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर श्रीमती मसरत अब्दुलरशीद शेख यानी पूरक कागदपत्रांसह खुलासा सादर केला.

'अपीलकर्त्यांनी दि. २४.३.२००९ रोजी सादर केलेला माहिती अधिकाराचा अर्ज हा बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन, महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा, सोलापूर या लेटरपॅडचा वापर करुन त्यावर माहिती-अधिकाराचा मजकुर टाईप केलेला आहे. सदर नमूद मजकुरामध्ये मागितलेली माहिती संदिग्ध असून माहिती कोणत्या कालावधीमधील आहे, त्याबाबतचा उल्लेख केलेला नाही. तसेच 'अर्जदाराचे नांव' यामध्ये अध्यक्ष, बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन, महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा, सोलापूर असे नमूद केलेले असून व्यक्तीचे नाव नाही. या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे सादर केलेल्या प्रथम अपिलाबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक यानी जा.प.क्र.जिपसो/शिक्षण/खाप्राशा/६०५ /०९ दि.२२.५.२००९ रोजी दिलेल्या पत्रानुसार श्री. एस.एम.इनामदार यानी केलेले अपील पदनामानुसार असल्यामुळे व व्यक्तीच्या नावाने नसल्यामुळे निकाली काढण्यात आलेले आहे. श्री. एस.एम.ईनामदार यानी बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन, महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा, सोलापूर या संस्थेच्या लेटरपॅडचा दुरुपयोग करुन स्वतः अध्यक्ष आहे असे भासवून वैयक्तिक नावाने अर्ज न करता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन माहिती मागितली असून सदर संस्था ही फक्त महसूल खाते व को. ऑप. बॅंकिंग विभाग या शाखेपुरतीच सक्रीय आहे. इतर कोणत्याच विभागात तिच्या शाखा अस्तित्वात नाहीत. श्री. एस.एम.इनामदार हे कृषी खात्यातून सेवानिवृत्त झाले असून त्यांचा सदर बहुजन एंम्प्लॉईज फेडरेशन जिल्हा शाखा, सोलापूर या संस्थेशी कोणताही संबंध नाही. तसेच त्यानी सदर संघटनेच्या

लेटरपॅडचा जो काही वापर चालू केला आहे, तो नियमबाहय व बेकायदेशीर आहे. हया संबंधाने लेटरपॅडचा कोणताही गैरवापर केल्यास ते व्यक्तिशः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, असे विधान असलेले पत्र श्री. अशोक जेटीथोर, जिल्हा संघटक यानी दिलेले असून पत्राचा श्री. एस.एम. इनामदार यानी दुरुपयोग करुन ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे पोलिस कमिशनर, सोलापूर यांचेकडे रीतसर तक्रार दि. ६.१२.२००८ रोजी सादर केली असून सदर बझार पोलिस स्टेशनमधील रजिस्टरमध्ये कक्ष-६/५७५/०८/ दि. १८.१२.२००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे', असे अहवालात नमूद केले आहे.

वरील अहवाल व त्या सोबतची पूरक कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी पदनामाने अर्ज केला असून त्याबाबतही अनधिकृतपणाची तक्रार दाखल आहे. या स्थितीत अपीलकर्त्याच्या तक्रारीची दखल घेता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुदाम पंढरीनाथ लोखंडे
मु.पो.वळती, ता.आंबेगांव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आंबेगांव,
तहसील कार्यालय, आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगांव,
तहसील कार्यालय, आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.सुदाम पंढरीनाथ लोखंडे<br>मु.पो.वळती, ता.आंबेगांव, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगांव,<br>तहसील कार्यालय, आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.वसंत मारुती गाडेकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : समाईक बोअरवेलसंबंधी तहसीलदार, आंबेगाव यानी दिलेल्या आदेशाची प्रत व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती, तसेच दुरूस्त ७/१२ उतारा मिळावा, अशी मागणी केली होती. परंतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : संबंधित माहिती कामगार तलाठ्यांच्या कक्षेतील असल्यामुळे दि.५.७.२०१० चा अर्ज दि.१५.७.२०१० च्या पत्रान्वये वर्ग करून तसे अपीलकर्त्यास कळविले. ऑक्टोबर २०१० मधील पंचनामा, जाबजबाब आदिंच्या नकला तहसील कार्यालयात पाठविण्यात आल्या असून आढळून येत नाहीत.

संबधित कागदपत्रांचा शोध घेऊन १५ दिवसांत अपीलकर्त्यास कळवावे व कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तहसीलदार, आंबेगाव यानी दि.३०.१०.२००८ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास दि.५.५२०११ च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगांव, तहसील कार्यालय, आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे यानी दि.५.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. मात्र आपल्याला छायांकित प्रती देण्यात येत असून त्या नको आहेत, मूळ कागदपत्रे मिळाली पाहिजेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री.लोखंडे यानी दि.२६.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव
घर नं. ३०५२, हॉटेल निलकमल शेजारी,
संकेश्वर रोड, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव
घर नं. ३०५२, हॉटेल निलकमल शेजारी, संकेश्वर रोड, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अशोक यशवंतराव जाधव

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. संजय हि. हेरवाडे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. आर.पी.पाटील

**तत्कालीन जन माहिती अधिकारी,**
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. एस.जी.केसरकर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

गडहिंग्लज नगरपरिषदेने सन १९९७ मध्ये दिलेल्या एका बांधकाम परवानगी संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. परंतु ठरावाची नक्कल वगळता कोणतीही माहिती मिळाली नाही. संबंधितांनी जाणूनबुजून कागदपत्रे गहाळ केली असून त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्या सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव यानी केली.

संबंधित मिळकत सामायिक होती व तत्कालीन नगरपरिषद अभियंता श्री.एस.एस.भोसले यांच्याकडेच या संदर्भातील संचिका होती. परंतु शोध घेऊनही ती सापडत नसल्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. राजेंद्र ब. तेली यानी केले. अपीलकर्त्यास कागदपत्रे मिळवून देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केला आहे. तथापि वादग्रस्त विषयातील संचिका अभिलेखात उपलब्ध न होणे ही बाब एका बांधकामापुरती मर्यादित नसून प्रातिनिधिक महत्वाची आहे, हे लक्षात घेता संबंधितांना संचिका सादर करण्याबाबत पुन्हा कळवून त्यानुसार पूर्तता न झाल्यास सार्वजनिक अभिलेख गहाळ करण्याबद्दल महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये जतन न केल्याप्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले, असे विद्यमान मुख्य अधिकारी यानी संबंधित खुलाशांच्या प्रतींसह अहवालात नमूद केले आहे. वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास संबंधित कागदपत्र उपलब्ध होण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्या पातळीवरुन कारवाई केली जाणे आवश्यक आहे.

नगरपरिषदेच्या अभिलेखात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यांना देण्यात आल्या. अन्य कागदपत्रांच्या नकला देण्याबाबत तत्कालीन नगर परिषद अभियंता, श्री. एस. एस. भोसले दि. १.१.२००९, १२.१.२००९ रोजी त्याना कळविले असूनही त्यानी कागदपत्रे दिलेली नाहीत. त्यामुळे त्याना दि.२०.५.२००९ रोजी नोटीस दिली. तसेच ज्यांना बांधकाम परवानगी दिली त्यांनाही स्वतंत्र नोटिसा दिल्या.

आयोगाच्या आदेशानुसार सन १९९७ नंतर गडहिंग्लज नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामध्ये काम केलेले नगरपरिषदेकडील १) श्री. डी.एच. खलीफ २) श्री. एन. एस. मिश्रकोटी ३) श्री. अे. एम. चव्हाण ४) सौ. ए. ए. दिवाण ५) श्री. एस. जी. केसरकर ६) श्री. एस. एस.तावडे ७) श्री. एस. डी. मोरे ८) श्री. एम. एल. शिंदे यांना दि. १६/१०/२०१० रोजी नोटिसा देऊन खुलासा मागणी करणेत आला. सदर नोटिशींपैकी अ.क्र. १ ते ७ लोकांनी खुलासा सादर केलेला आहे. तसेच श्री. एस.एस.भोसले, नगरपरिषद अभियंता, इचलकरंजी (तत्कालीन नगरपरिषद अभियंता गडहिंग्लज) याना सुध्दा दि. १६/१०/२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने आयोगाचे आदेश कळविले. 'अपील क्र. ११८८/२००९ मध्ये राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यानी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदरची कागदपत्रे/ फाईल नगरपरिषदेमार्फत अपिलार्थींना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत. सदर कागदपत्रे/ फाईल १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावीत. सदर कागदपत्रे नगरपरिषदेकडे शोधूनही न मिळाल्यास किंवा तुमचेकडे उपलब्ध न झाल्यास, कागदपत्रे गहाळ केल्याबद्दल फौजदारी गुन्हा नोंद करणेत येईल', असेही त्याना कळविण्यात आले होते. सदरची नोटिस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविणेत आली होती. परंतु सदर रजिस्टर्ड नोटिस त्यानी स्वीकारली नसलेने परत आलेली आहे. याशिवाय श्री. एस.एस.भोसले सध्या इचलकरंजी नगरपरिषद येथे कार्यरत असलेने दि. १६/१०/२०१० रोजीची नोटीस त्याना पोच करुन त्याबाबत इकडे कळविणेस मुख्याधिकारी इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी याना इकडील जा.क्र. न.व.शि.जा/१३/६९३/२०१० दि. १६/१०/२०१० अन्वये कळविणेत आले होते. सदर नोटीस त्यानी श्री. भोसले याना दिनांक २१/१०/२०१० रोजी लागू करुन त्याबाबतची पोच घेऊन त्यांचेकडील दि. २५/१०/२०१० रोजीच्या पत्रान्वये इकडे पाठविलेली आहे. श्री. सयाजीराव सखाराम भोसले, नगरपरिषद अभियंता, इचलकरंजी (तत्कालीन नगरपरिषद अभियंता) यानी काल त्यांचे दि. २/१२/२०१० रोजी व दि. १६/१०/२०१० रोजीच्या नोटिशीस उत्तर देऊन खुलासा केला आहे. सदर खुलाशात मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे यानी सदर अपील सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाची प्रत/ इतिवृत्ताची प्रत मागणी केली आहे. त्यानंतर पुन्हा आपले म्हणणे सादर करीत आहे, असे कळविलेले आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. संजय हेरवाडे यानी लेखी व तोंडी नमूद केले. श्री. एस.एस.भोसले यांची दि. ३ जानेवारी २००९ रोजी इचलकरंजी येथे बदली झाली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. संजय हि. हेरवाडे यानी उपरोक्त अहवालासोबत नमूद केलेल्या कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या आहेत. हा अहवाल व सर्व कागदपत्रे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद अभियंता, गडहिंग्लज जि. कोल्हापूर श्री. एस. एस. भोसले यांचा संदर्भित संचिकेसंदर्भातील लेखी खुलासा विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. राजेंद्र तेली यानी घ्यावा व अपीलकर्ता यानी माहितीची मागणी केलेल्या संचिकेच्या जतनाच्या कालावधीनुसार ती प्राप्त न होण्यास जबाबदार असणारे कर्मचारी/ अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा व अनुपालन अहवाल दि. १५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

विद्यमान जन माहिती अधिकारी - श्री. आर. पी. पाटील ( फोन नं. ८६०५००९७०१ )

तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. एस. जी. केसरकर ( फोन नं. ८६०५००९७०२ )

विद्यमान अपिलीय प्राधिकारी - श्री. राजेंद्र तेली

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी - श्री. संजय हेरवाडे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय रामचंद्र बारवकर
८३५, भवानी पेठ, पुणे-४११००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय रामचंद्र बारवकर
८३५, भवानी पेठ, पुणे-४११००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.हे.प्र.देवधर

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शिवाजी कोंडाजी लंके व सुरेश एकनाथ देसाई

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मंदिराची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतली असून त्याबाबत भूमी जिंदगी व उद्यान विभाग यानी प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती व वास्तूपत्रकातील नोंदी यामध्ये तफावत असल्याचे म्हटले आहे. मला कागदपत्रे दाखविण्यात आली. परंतु माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : श्री.बारवकर यानी विचारणा केलेली जागा ही 'खुली जागा' असून अर्जात तसे स्पष्टपणे नमूद केले नव्हते व याच मिळकतीबाबत यापूर्वी माहिती देण्यात आली होती. या विषयसाधर्म्यातील गफलतीमुळे त्याना अपेक्षित असलेला वेगळा तपशील विहित मुदतीत दिला गेला नाही. वास्तूपत्रक व नकाशावरील नोंदी याची माहिती देऊन अन्य माहितीसाठी त्यांचा अर्ज भूमी आणि जिंदगी विभागाकडे विहित मुदतीत वर्ग करण्यात आला. इतर माहिती विकास योजना विभागाकडे असल्याने त्यांच्याकडून घेण्याबाबत कळविले व संबंधित विभागाला तसे अवगत केले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यास कोणतीही माहिती नाकारलेली नाही. दाखविलेली माहिती उपयुक्त नसल्याचे त्यानी सांगितल्यामुळे दिली नाही. कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास उपलब्ध करून देता येतील.

संबंधित विभागांकडे अर्ज वर्ग केल्याच्या व माहिती देण्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी आयोगाला सादर कराव्यात. तसेच विविध विभागांकडील माहिती एकत्रित करून अपीलकर्त्यास १५ दिवसांत पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित संपूर्ण प्रकरणाची छायांकित प्रत तयार करून श्री.बारवकर यांच्याशी संपर्क साधला असता माहिती टपालाने पाठविण्यास त्यानी सांगितले. त्यानुसार दि.१५.४.२०११ रोजी टपालाने माहिती पाठविली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शिवाजी कोंडाजी लंके व जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे सुरेश एकनाथ देसाई यांनी दि.४.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. मात्र ७७ पृष्ठांच्या प्रती आपल्याला पाठविण्यात आल्या असल्या तरी मंदिराची जागा एक रूपयाच्या मोबदल्यात कोणाला दिली याबद्दलची

माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय रामचंद्र बारवकर यानी दि.३०.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्यांच्या मूळ अर्जात स्पष्ट स्वरूपात अशी मागणी नसली तरी सार्वजनिक जागेविषयीच्या व्यवहाराच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने अपीलकर्त्यास ही माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यानी अर्जात नमूद केलेली सुभाषनगर महादेव मंदिर, रजि.नं.ए-२१०३, ११४५ शुक्रवार पेठ, पुणे या मंदिराची जागा एक रूपयाच्या मोबदल्यात कधीपासून व कोणाला देण्यात आली याची माहिती पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यानी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी व अनुपालन अहवाल दि.२०.५.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धनंजय अनिल मव्दाण्णा
सि.स.नं.३९५, केशवनाथ मंदिरामागे,
सांभारे गणपती रोड, गावभाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, रामनेमी परिसर,
वुडहाऊस रोड, सांगली.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अकौंटंट,
लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, रामनेमी परिसर,
वुडहाऊस रोड, सांगली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७९/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता-** श्री. धनंजय अनिल मव्दाण्णा
सि.स.नं.३९५, केशवनाथ मंदिरामागे,
सांभारे गणपती रोड, गावभाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, राजनेमी परिसर,
वुडहाऊस रोड, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. आर.एस. हांडे

**जन माहिती अधिकारी** तथा अकौंटंट,

| | |
|---|---|
| | लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, राजनेमी परिसर,<br>वुडहाऊस रोड, सांगली श्री. शरदकुमार पारीसा उपाध्ये |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

. आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - प्राचार्यांकडून होणाऱ्या त्रासाबाबत केलेल्या तक्रारीवरील माहिती मागणाऱ्या अर्जाला जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले नाही. आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलाची दखल घेतली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर प्राचार्यांच्या कृतीमुळे मर्यादा आल्या असल्यामुळे जिवित व स्वातंत्र्याशी निगडित अशी ही माहिती ४८ तासांत देण्याची मागणी केली होती. परंतु विहित मुदतीत ती दिली नाहीच, उलट माझ्या विरुध्द एका विद्यार्थिनीच्या लैंगिक छळाचे व रॅगिंगचे बनावट प्रकरण रचले. चार महिन्यांनी माहिती दिली. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व विद्यार्थ्यांच्या व्यापक हिताच्या दृष्टीने लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली या शिक्षण संस्थेच्या गैरकारभाराची सखोल चौकशी व्हावी.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. २०.२.२००९ च्या अर्जाला दि. २६.२.२००९ रोजी उत्तर दिले. जिवित आणि स्वातंत्र्याचा विषय असल्याबाबतचे स्पष्टीकरण मागितले. परंतु त्यानी दिले नाही व त्यानंतर त्यानी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. मूळ अर्जात विशिष्ट गृहिते नमूद करुन त्यानी विधाने केली आहेत व त्या अनुषंगाने कारणे, दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कारवाई आदिबाबतची गैरलागू माहिती मागितली आहे. प्राचार्यांविरुध्दच्या मूळ तक्रारीची चौकशी करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास उत्तर दिले. अपीलकर्ता दबावासाठी व नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहे. त्यांच्या विरुध्दचे विद्यार्थिनीचे आरोप व त्याबाबतची पोलिस कारवाई हा माहितीच्या अधिकाराशी व प्रस्तुत अर्जाशी संबंधित विषय नाही.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी - अपीलकर्ता यानी प्राचार्यांविरुध्द 'सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने' अशा स्वरुपाची तक्रार केली होती. ही बाब जिवित व स्वातंत्र्याशी संबंधित नाही. तसेच त्यांची नेमकी

तक्रार काय आहे, हेही स्पष्ट नव्हते व कागदपत्रांमध्ये असलेल्या माहितीची मागणी नव्हती, त्यामुळे देणे शक्य नव्हते. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांची बाजू ऐकून निर्णय दिला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री. धनंजय अनिल मव्दाण्णा यानी नमूद केलेली माहिती कोणाच्याही जिवित व स्वातंत्र्याशी निगडित अशा तातडीच्या स्वरुपाची नाही. तसेच माहितीची मागणी भाष्याविना व नेमक्या स्वरुपात करणे आवश्यक आहे. मात्र जन माहिती अधिकारी अकौंटंट, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, राजनेमी परिसर, वुडहाऊस रोड, सांगली श्री. शरदकुमार पारीसा उपाध्ये यानी त्याबाबतचे स्पष्टीकरण मागण्याऐवजी मूळ तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती देणे अधिक योग्य ठरले असते. स्पष्टीकरण मागण्याची त्यांची कृती तांत्रिक स्वरुपाची व सकारात्मक नाही. प्राचार्यांबाबतच्या तक्रारीची चौकशी दि.२५.२.२००९ रोजी

झालेली असताना त्याबाबतची माहिती ते देऊ शकले असते. याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश शंकरप्पा हिंडोळे
बसवेश्वर, मार्केट यार्ड, **अपीलकर्ता**
अक्कलकोट, जि.सोलापूर-४१३ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ),**
सोलापूर शहर, पोलीस आयुक्तालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
सोलापूर ग्रामीण, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४६/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुरेश शंकरप्पा हिंडोळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिका-यांचे उत्तर व अपिलीय प्राधिका-यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.देवीदास एकनाथराव निकम
ड्रिम्सपार्क, फ्लॅट नं.४६, बिल्डिंग नं.२, विंग-बी, पडवळ हॉस्पिटलमागे,
साने चौक, मोरेवस्ती, चिखली, पुणे-४१२११४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७५ / २०१० २ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.देवीदास एकनाथराव निकम
ड्रिम्सपार्क, फ्लॅट नं.४६, बिल्डिंग नं.२, विंग-बी, पडवळ हॉस्पिटलमागे,
साने चौक, मोरेवस्ती, चिखली, पुणे-४१२११४

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.व्ही.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझ्या बदलीबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयाने दिलेल्या पत्राची प्रत व टिपणीच्या प्रती अशी माहिती मागितली असता प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले व माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. न्यायालयीन प्रकरणाचा व माहितीचा संबंध नाही. बदली करण्यासंदर्भातील पत्र खोटे असल्यामुळे त्याची प्रत दिली जाणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : बोधीसत्त्व प्रतिष्ठान, शाहूनगर, चिंचवड, पुणे या संस्थेच्या दोन शाळा असून श्री.निकम यांच्या बदलीविषयीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे संस्थेने लेखी दिले आहे. अपीलकर्त संदर्भ देतात ते पत्र तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.भुजबळ यांच्या सहीचे आहे. मात्र त्याची नसती अभिलेखात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत देता आली नाही.

अपिलीय प्राधिकारी : संस्थेने श्री.निकम यांची केलेली बदली जिल्हांतर्गत असल्यामुळे व जिल्हांतर्गत बदल्यांसाठी मान्यता घेण्याची पध्दत नव्हती, त्यामुळे मान्यतेच्या प्रती, अनुषंगिक टिपणी वगैरे माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे तसा निकाल दिला.

जिल्हांतर्गत बदलीसाठी मान्यता घेतली नसल्यास मान्यतेच्या व अनुषंगिक टिपण्याच्या प्रती ही माहिती अस्तित्वात नसल्यामुळे ती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार ग्राह्य मानता येणार नाही. मात्र संबंधित पत्राबाबत तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.डी.एस.भुजबळ यांच्याकडून शहानिशा करून अपीलकर्ता श्री.निकम याना या पत्राच्या प्रतीसह लेखी उत्तर आठ दिवसांत द्यावे, परंतु अद्याप माहिती मिळालेली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.२.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यानी दि.९.५.२०११ अन्वये अहवाल सादर केला. ‘या कार्यालयामार्फत जा.क्र.शिक्षण/माध्य/५४२/११, दि.२५.२.२०११ अन्वये तत्कालीन उपशिक्षणाधिकारी श्री.डी.एस.भुजबळ याना श्री.निकम यांचे बदलीबाबत सचिव, बोधिसत्त्व प्रतिष्ठान, शाहुनगर, चिंचवड, पुणे जा.क्र.शिक्षण/माध्य.४/२०१०, दि.२०.२.२०१० रोजी त्यांचे स्वाक्षरीनिशी पाठविण्यात आलेल्या पत्राबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदरबाबत

श्री.निकम यानी या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दि.८.३.२०११ अन्वये श्री.डी.एस.भुजबळ यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत या कार्यालयाकडे मागितली आहे. ती संबंधितांना दि.८.४.२०११ च्या पत्रान्वये समक्ष उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच श्री.निकम यानी दि.२८.४.२०११ रोजी या कार्यालयाकडे पुन्हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये श्री.डी.एस.भुजबळ यानी दिलेल्या खुलाशाची प्रत समक्ष मागितली आहे. ती श्री.निकम याना जा.क्र.१४५७, दि.४.५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे समक्ष उपस्थित राहून उपलब्ध करून घेण्याबाबत कळविले आहे,' असे अहवालात नमूद केले आहे. अहवाल तत्परतेने सादर करणे आवश्यक असल्याची समज अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हरि आप्पा प्रक्षाळे
मु. पो. अनिलनगर, मसोबा मंदीर समोर, अपीलकर्ता
वीटभट्टीजवळ, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, सोगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी -** श्री. संजय हरिश्चंद्र प्रवार

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती सांगोला, ता. सांगोला,
जि. सोलापूर श्री. जे. आर. आडसूळ

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, सांगोला,
जि. सोलापूर श्री. एम.ए.उंबरजे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी</u> - अपीलकर्ता श्री. हरि आप्पा प्रक्षाळे हे शेतमजूर असून एका वृत्तपत्राचे प्रतिनिधी म्हणून काम करतात. त्याना दरमहा १०००/- रुपये मानधन मिळते. ते दारिद्र्य रेषेखालील असून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या सांगोला उपविभागातर्फे सन २००४ ते २००८-०९ या कालावधीत केलेल्या कामांची व कर्मचारी/अधिकारी यांच्याबाबतची विस्तृत माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> - अपीलकर्ता याना विहित मुदतीत उत्तर पाठवून दारिद्र्य रेषेखालील दाखला सादर करण्यास, तसेच माहिती विस्तृत असल्यामुळे निःशुल्क देण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याबाबत कळविले होते. अनुदानाबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी केली होती. अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचेही कळविले होते. परंतु अपीलकर्त्यांनी संपर्क साधला नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, सांगोला, जि. सोलापूर श्री. एम.ए.उंबरजे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. जे. आर. आडसूळ यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या प्रतींची लेखी मागणी जन माहिती

अधिकारी यांच्याकडे करावी व जन माहिती अधिकारी यानी निधीच्या उपलब्धतेनुसार शक्य तेवढी माहिती निःशुल्क द्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक अंबादास साळुंखे
रा. १४, रेल्वे लाईन्स, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८१/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. आर. आर. ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. ए. एन. तोगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

सोलापूर सहकारी सूत गिरणी कामगार क्रेडिट सोसायटी, सोलापूर व यशवंत सहकारी सूत गिरणी कामगार क्रेडिट सोसायटी, सोलापूर यांची माहिती मागितली होती. सोलापूर सहकारी सूत गिरणी कामगार क्रेडिट सोसायटी या पतसंस्थेची माहिती मिळाली. यशवंत सहकारी सूत गिरणी कामगार क्रेडिट सोसायटी या पतसंस्थेवर अवसायक नियुक्त नसून ती माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे नसल्यामुळे मिळाली नाही, असे अपीलकर्ता श्री. दिपक अंबादास साळुंखे यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सुनावणीच्या वेळी सादर केले. सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भानुदास सोपान शिंदे
११९, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा मु. पो. मार्डी,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६७/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भानुदास सोपान शिंदे
११९, उत्तर कसबा, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. सुनिल ना. खमितकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा मु. पो. मार्डी,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर श्रीमती रुक्मीणी परशुराम लांबतुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा, मार्डी या आश्रमशाळेच्या संदर्भातील एप्रिल २००१ ते जानेवारी २०१० या कालावधीतील विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. शुल्क भरल्यानंतरही अपुरी माहिती देण्यात आल्यामुळे ती घेतली नाही. पूर्ण माहिती निःशुल्क मिळावी.

<u>जन माहिती अधिकारी</u>- अपीलकर्ता यानी ९ वर्षांच्या काळातील १५ मुद्दयांची अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. त्यांचा दि. १६.१.२०१० चा अर्ज दि. २२.१.२०१० रोजी प्राप्त झाला. दि. ११.२.२०१० च्या पत्रान्वये रु ६९७६/- रुपये शुल्क कळविले. त्यानी शुल्क भरले नाही व माहिती निःशुल्क मिळावी, म्हणून दि. २३.२.२०१० च्या पत्रान्वये (प्राप्त दि. ४.३.२०१०) मागणी केली. माहिती निःशुल्क देता येणार नाही, असे दि. ८.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यानी मुद्दा क्र. ६ ते १२ ची माहिती मिळाली तरी चालेल, असे सांगितले. तसेच कागदपत्रे बघून हवी असलेली माहिती घेऊ, असेही सांगितले. माहिती घेण्यास ते आले नाहीत म्हणून माहिती दिलेली नाही. अपीलकर्ता स्वतः सरकारी कर्मचारी असून माहितीपेक्षा त्रास देण्यात त्याना रस आहे. अशा अपीलकर्त्यांवरही कारवाई व्हावी.

<u>अपिलीय प्राधिकारी</u>- जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत कळवूनही अपीलकर्त्यानी शुल्क भरले नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीत ठरल्याप्रमाणे अपीलकर्त्यांना आवश्यक असलेल्या मर्यादित माहितीसाठी ३१६/- रुपयांचे चलन मंजूर करुन दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी तेवढी माहिती सादर केली. परंतु ती अपुरी असल्याची तक्रार करुन अपीलकर्त्यांनी ती स्वीकारली नाही. माहिती विस्तृत असून तयार केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा मु. पो. मार्डी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर श्रीमती रुक्मिणी परशुराम लांबतुरे व अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. सुनिल ना. खमितकर यांनी सर्व पत्रव्यवहारासह पूरक कागदपत्रे व अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार देऊ केलेल्या मर्यादित माहितीच्या प्रती सादर केल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास ६९७६/- रुपये शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल. शुल्क न भरता

माहिती न मिळाल्याची तक्रार करणे ही अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नानासाहेब भुजंगराव जाधवर
मु. वालवड, ता. बार्शी,
जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५००/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्रीमती भगिरथी जालिंदर जाधवर यांच्याकडील स्वत: धान्य दुकानातील धान्याचे व केरोसीनचे वितरण याबाबतची सन २००४ ते २००९ या काळातील माहिती आपण मागितली होती. जन माहिती

अधिकारी यानी उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नानासाहेब भुजंगराव जाधवर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता श्री. नानासाहेब भुजंगराव जाधवर यानी पाच वर्षांच्या काळातील व पाच गावांमधील धान्य व केरोसीन वितरणासंबंधातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. ही माहिती तहसील कार्यालयाच्या अभिलेखातील नसून स्वत धान्य दुकानदाराकडील असल्याने त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन द्यावयाची असल्यामुळे विलंब लागेल, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर यानी अपीलकर्त्यास कळविले. अभिलेखातील काही माहिती त्यानी अपीलकर्त्यास प्रत्यक्ष दाखविली. अपीलकर्त्यांचा अर्ज दि. १२.१.२०१० चा असून जन माहिती अधिकारी यानी दि. १८.१.२०१० च्या पत्रान्वये संबंधित स्वस्त धान्य दुकानदारास कळविले व वारंवार तोंडी सूचनाही दिल्या. परंतु त्यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्त्यास देता आली नाही. एक महिन्याची मुदत मिळावी. या कालावधीत दुकानदाराकडून सक्तीने माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास देण्याची व्यवस्था करीत आहोत. माहिती न दिल्यास सदर दुकानदाराचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी केले. आयोगाने ते मान्य केले. संबंधित दुकानदाराकडून तरीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे आणखी एक महिना मुदतवाढ देण्याची विनंती अपिलीय प्राधिकारी श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी दि. ६.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला केली. आयोगाने त्यास मान्यता दिली. परंतु त्यानुसारही माहिती देण्याबाबत पूर्तता झाली नाही. या संदर्भात आयोगाने विचारणा केल्यानुसार अपिलीय प्राधिकारी श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी दि. ३.५.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला.

'माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देणेबाबत अपिलीय प्राधिकारी या नात्याने शासकीय माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, बार्शी व पुरवठा लिपिक यांना या कार्यालयाचे पत्र क्र. १) क्र.कुका/शामाअ/एसआर-१३/१०दि.२३.११.२०१० २) क्र.कुका/शामाअ/एसआर-२३८/१० दि.३.१.२०११ ३) क्र.कुका/कावि/४ शामाअ/ एसआर-१३/१० दि.३.१.२०११ ४) क्र. कुका/कावि/२३/ दि.७.२.२०११ अन्वये चार वेळा

कळवूनसुध्दा त्यांनी माहिती दिलेली नाही. त्यामुळे शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, बार्शी व पुरवठा लिपिक हे माहिती देण्यात टाळाटाळ करत आहेत हे आपल्या निदर्शनास आणून देत आहे', असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी अहवालात नमूद केले असून १) श्री. व्ही. टी. जमादार २) श्री. टी. एल. सातपुते व ३) श्री. एन. बी. परतनाळे यांना दि. ३/१/२०११ रोजी दिलेल्या नोटिशींच्या प्रती सादर केल्या आहेत. त्यांचा अहवाल लक्षात घेता १) श्री. व्ही. टी. जमादर २) श्री. टी.एल.सातपुते व ३) श्री. एन.बी. परतनाळे हे शास्तीस पात्र ठरतात. स्वस्त धान्य दुकान व केरोसीन विक्री ही शासकीय नियंत्रणाखालील बाब असून स्वस्त धान्य व केरोसीन वितरण या शासकीय योजनांसंबंधातील कागदपत्रे प्राप्त करुन घेणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. तसेच अशी कागदपत्रे हे सार्वजनिक स्वरुपाच्या माहितीचे अभिलेख असून ते शासनाला उपलब्ध न करुन देणे म्हणजे शासनाच्या योजनेबाबतच्या सार्वजनिक कारभारात पारदर्शकता न ठेवणे होय. त्याबद्दल संबंधित दुकानदारांवर कारवाई होणे आवश्यक आहे. तशी कारवाई करण्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी लेखी व तोंडी निवेदन नमूद केले असूनही त्यानुसार पुढील कार्यवाही केलेली नाही. त्याबाबतचे स्पष्टीकरणही त्यानी दिलेले नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न देणे, वाढीव मुदतीनंतरही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी वारंवार समज देऊनही माहिती देण्यास टाळाटाळ करणे याबद्दल श्री. व्ही. टी. जमादार, जन माहिती अधिकारी, बार्शी, तसेच माहिती देण्यास ज्यांचे सहाय्य मागितले व म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४, ५) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी ठरणारे श्री. टी. एल. सातपुते, सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून,बार्शी व श्री. एन.बी. परतनाळे, पुरवठा लिपिक, बार्शी हे शास्तीस पात्र ठरतात. संबंधितांवरील जबाबदारी लक्षात घेता १) श्री. व्ही. टी.

जमादार याना रु. १०,०००/- २) श्री. टी.एल.सातपुते याना रु. १०,०००/- व ३) श्री. एन.बी. परतनाळे याना रु. ५०००/- अशी एकूण रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम त्यांच्या जून २०११ व जुलै २०११ च्या अनुक्रमे जुलै २०११ व ऑगस्ट २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून दोन समान हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. सार्वजनिक अभिलेख शासनाला उपलब्ध करुन न देणा-या संबंधित दुकानदाराविरुध्द केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गणपत शेळके यानी दि. ३०.५.२०११ पर्यंत पूरक कागदपत्रांसह आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अर्जुन लक्ष्मण पवार
रा. आंधळगाव, ता. मंगळवेढा,
जि. सोलापूर

**अपिलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
उप विभागिय कृषि अधिकारी ,
मंगळवेढा, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
तालुका कृषि अधिकारी ,
मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३१/ सोलापूर |
| २ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** :- मंगळवेढा तालुक्यात कृषी विभागाअंतर्गत सुरु असणा-या कामाचे गावनिहाय आठवडयाच्या पगाराचे रोजगार पत्रक व फिल्ड वर्क करणा-या अधिका-याचे मुख्यालय बदलले असल्यास त्याबाबतची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २७.०२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. 'माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ,मंगळवेढा, जि. सोलापूर यांच्याकडून मिळाली असल्यामुळे माझे समाधान झालेआहे', असे अपिलकर्ता श्री. अर्जुन लक्ष्मण पवार यांचे निवेदन जन माहिती अधिकारी

तथा कृषि अधिकारी ,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी दि. ३१.०३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2011

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक शंकर जोरकर
११९७/२, रामनारायण बंगला, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे-५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी, क विभाग,
शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक शंकर जोरकर
११९७/२, रामनारायण बंगला, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे-४११००५

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी, क विभाग,
शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.एस.एम.अंबोळे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : १२ झोपडपट्टीधारकांची नावे देऊन त्यांच्या शिधापत्रिकांचे पुरावे सादर केले होते. याबाबतची पडताळणी होऊन त्यांच्या निवासाच्या पुराव्यासह कागदपत्रांच्या प्रती मिळण्याची मागणी केली होती. मी ४० वर्षे त्याच वस्तीत रहात असून नावे नमूद केलेल्या व्यक्ती तेथे रहात नाहीत. शिधापत्रिका बनावट आहेत. म्हणून त्यासोबतची कागदपत्रे नष्ट केल्याचे सांगितले जात आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी क्रमांक दिलेल्या शिधापत्रिका सन १९९१ ते १९९५ या कालावधीतील असल्याचे दिसून येते. त्यासोबतची कागदपत्रे ड वर्गातील असून पाच वर्षांनंतर नष्ट केली जातात. तसेच शिधापत्रिकांचे नूतनीकरण झाले नसल्यामुळे प्रथमदर्शनी त्या रद्द असल्याचे दिसून येते, असे दि.३.४.२०१० च्या अर्जावर दि.२८.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले.

शिधापत्रिकांबाबतची पडताळणी करून माहिती द्यावी, ही मागणी वस्तुतः प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. परंतु शिधापत्रिका हा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील महत्त्वाचा भाग असून त्याबाबत वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास/नागरिकांना दिली जाणे कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याशिवाय मूळ दसतऐवजाची सत्यासत्यता स्पष्ट होणार नाही. म्हणून या शिधापत्रिकांबाबतच्या वस्तुस्थितीची चौकशी करून आयोगाला अहवाल सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. संबंधित शिधापत्रिकांच्या छायांकित प्रतीवर नमूद केलेल्या पत्त्यावर संबंधित शिधापत्रिकाधारक रहात नसल्याचे पुरवठा निरीक्षकांच्या चौकशीत आढळून आले, असा अहवाल परिमंडळ अधिकारी क- विभाग श्री.एस.एम.अंबोळे यानी स्थानिक रहिवाशांच्या जबाबाच्या प्रतींसह दि.२८.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अहवाल सादर करण्यास आयोगाने दहा दिवसांची मुदत दिली असताना जन माहिती अधिकाऱ्यांनी स्मरणपत्र दिल्यानंतर

परिमंडळ अधिकारी यानी अहवाल सादर केला. या विलंबाबाबत श्री.एस.एम.अंबोळे त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रशांत जयवंत दोशी
१२०४/१०, आपटे रोड, पुणे ४११ ००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रशांत जयवंत दोशी
१२०४/१०, आपटे रोड, पुणे ४११ ००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे सौ. मीरा श्रीनिवास सबनीस

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मणिकांचन बंगल्यातील बांधकामाच्या संदर्भात सन २००७ ते २००९ या काळात महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त, उपमहापौर, मिळकत कर विभाग आदिंना पाठविलेल्या पत्रांच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. त्याबाबतचे स्पष्टीकरण माहितीच्या अधिकारात मागितले असता दिले जात नाही.

जन माहिती अधिकारी- उपरोक्त मिळकतीबाबत अपीलकर्ता सातत्याने विविध स्वरुपाचे अर्ज व पत्रव्यवहार करीत असून वेळोवेळी माहिती दिली आहे. संपूर्ण प्रकरणाची छायांकित प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे. त्यांच्या पत्रानुसार कारवाई न करण्याचे स्पष्टीकरण आदि बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे सौ. मीरा श्रीनिवास सबनीस
यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन रामचंद्र पवार
चतु:श्रृंगी, वैदुवाडी, पुणे ४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस आयुक्त,
परिमंडळ क्र. ३, पुणे शहर, पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. मोहन रामचंद्र पवार<br>चतु:श्रृंगी, वैदुवाडी, पुणे ४११ ०१६<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे श्री. वि. रा. माने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - सन १९९८ ते २००९ या काळात पोलिसांकडे १९ अर्ज केले. त्यातील मागणीनुसार

चौकशी होऊन कारवाई केली जात नाही व चुकीची माहिती दिली जाते. सर्व अर्जांची पोहोच माझ्याकडे आहे. परंतु पोलिस मात्र अर्ज मिळाले नसल्याचे त्या त्या वेळी सांगतात.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या अर्जांबाबत सर्व संबंधित कार्यालयांकडे विचारणा केली असता अर्ज मिळाले नसल्याचे त्यानी कळविले. अपील मागे घेत असल्याचे श्री. पवार यानी लिहूनही दिले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यांच्याकडे पोहोच असलेल्या अर्जांच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी घ्याव्या व त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी व तपशीलवार अहवाल एक महिन्यात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे श्री. वि. रा. माने यानी दि २०.११.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास अर्जनिहाय कार्यवाहीची माहिती कळविली व दि २४.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला तपशीलवार अहवाल सादर केला. आपल्या अर्जांनुसार फेर चौकशी करण्यात यावी, असे अपीलकर्ता श्री. मोहन रामचंद्र पवार यानी माहितीच्या प्रतींवर पोहोच देतांना नमूद केले आहे अशी चौकशी करण्याचे आदेश वरिष्ठ पोलिस निरीक्षक, चतुश्रृंगी पोलिस स्टेशन याना देण्यात आले असून त्याची प्रत श्री. पवार याना दिली आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवाल सादर करण्यात येईल. असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे श्री. वि. रा. माने यानी अहवालात नमूद केले आहे. अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि चौकशी करण्याची सकारात्मक भूमिका जन माहिती अधिकारी यानी घेतली हे उल्लेखनिय आहे. नमूद केलेल्या मुदतीत चौकशी पूर्ण होताच अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पुरवून जन माहिती अधिकारी श्री. वि. रा. माने यानी तसे आयोगास अवगत करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबू बाळकू मोगलाडे
मु.पो.नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
२९३५, सी-वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०९ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी-वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.सुधीर देवगोंडा अलगौडर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.रणजित रघुनाथराव देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाबू बाळकू मोगलाडे यानी मोजणीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. त्यांच्या दि.१३.७.२००९ च्या अर्जाला दि.१०.८.२००९ च्या पत्रान्वये उत्तर व माहिती दिली. निमताना मोजणीच्या संदर्भात त्यांची मुख्य मागणी होती. हे प्रकरण दि.२८.६.२०१० रोजी रितसर मोजणी करून निकाली काढण्यात आले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.रणजित रघुनाथराव देशमुख यानी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय शिवाजी गाडेकर
मु. पो. तांबोळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सामान्य प्रशासन विभाग नं. २, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. परमेश्वर मारोतीराव राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सामान्य प्रशासन विभाग नं. २,
जिल्हा परिशद, सोलापूर श्री. महेंद्र राघवेंद्र बुगड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६/७/२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. २३/२/२०११ रोजी घेण्यात आली.

कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या परीक्षेला बसलेल्या उमेदवारांबाबतची माहिती व काही उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अपीलकर्ता श्री. संजय शिवाजी गाडेकर यानी दि. १.१२.२००८ च्या अर्जान्वये मागितल्या होत्या. अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती देऊ नये, असे शासनाचे आदेश आहेत. त्यामुळे त्या वगळता सर्व माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग नं. २, जिल्हा परिशद, सोलापूर श्री. महेंद्र राघवेंद्र बुगड व अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. परमेश्वर मारोतीराव राऊत यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातही या बाबी स्पष्ट करण्यात आल्या असून प्रथम अपिलाच्या सुनावणीला, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व आयोगापुढील सुनावणीलाही अपीलकर्ता उपस्थित नसल्याचे त्यांनी नमूद केले .

कंत्राटी ग्रामसेवक पदाची भरती ही सार्वजनिक सेवकांची भरती आहे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गाभा असून सार्वजनिक/जनतेच्या निधीतून जनतेच्या/शासकीय कामासाठी व नागरिकांमधून होणारी सार्वजनिक सेवकांच्या निवडीची/भरतीची प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक आहे. वस्तुतः सर्वच उमेदवारांच्या उत्तरपत्रिका नागरिकांना अवलोकनासाठी उपलब्ध असल्या पाहिजेत. परंतु तो मुद्दा तूर्त बाजूला ठेवला, तरी किमान संबंधित उमेदवाराला त्याच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची प्रत दिली गेली पाहिजे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. राजेश जनार्दन बंडगर
२. श्री. तातोबा ज्ञा. वाघमारे
३. सौ. निता म. सवाईराम अपीलकर्ता
४. श्री. विनेश द. श्रीराम
५. श्री. छबुसिंह बिसेनी
ए-१०, पंधारकर पार्क, सिध्देश्वर नगरजवळ,
नविन आर.टी.ओ.ऑफिस विजापूर रोड, सोलापूर -४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, स्वारगेट, पुणे.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, स्वारगेट, पुणे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३४/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. राजेश जनार्दन बंडगर<br>ए-१०, पंधारकर पार्क, सिध्देश्वर नगरजवळ,<br>नविन आर.टी.ओ.ऑफिस विजापूर रोड, सोलापूर - ४ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जात वैधता तपासून प्रमाणपत्र देण्याची व अर्जासोबत दिलेली मूळ कागदपत्रे परत मिळण्याची मागणी केली असून ती न दिल्यामुळे आमचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. राजेश जनार्दन बंडगर यानी केले.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून जन माहिती अधिकारी यानी त्याबाबत विहित मुदतीत अपीलकर्त्यास कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, स्वारगेट, पुणे श्री. प्रमोद जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, स्वारगेट, पुणे श्री. प्रकाश पाटील यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दादाराव चंद्रकांत कांबळे
सिध्दार्थनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
वीज वितरण कंपनी, ग्रामीण विभाग, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज
वितरण कंपनी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दादाराव चंद्रकांत कांबळे
सिध्दार्थनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज
वितरण कंपनी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.बी.आर.लोंढे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : वीजग्राहकांच्या थकित बिलांबाबतची व त्या अनुषंगाने अन्य माहिती दि.२.३.२००९च्या अर्जाद्वारे मागितली होती. त्यातील एकाही मुद्दयाची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास उत्तर वा माहिती दिल्याचे कागदपत्रांवरून दिसत नाही. आयोगापुढील अपिलाच्या सुनावणीची सूचना प्राप्त झ ाल्यानंतर माहिती संकलित करून सोबत आणली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.सोपान नामदेव मिसाळ यांचा खुलासा दहा दिवसांत आयोगाला सादर करावा, तसेच अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, ग्रामीण विभाग, सोलापूर श्री.डी.बी.प्रसाद यानी दि.२.११.२०१० च्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.सोपान नामदेव मिसाळ याना कळविले. श्री.सोपान नामदेव मिसाळ यानी दि.२८.३.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. आजारपण, कौटुंबिक अडचणी, कामाचा ताण यामुळे माहिती वेळेत देता आली नाही व डिसेंबर २०१० मध्ये आपल्याला अपघात झाल्यामुळे खुलासा पाठविण्यास उशीर झाला, असे त्यानी खुलाशात नमूद केले आहे. माहिती-मागणीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करण्याची ही कारणे समर्थनीय नाहीत. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.सोपान नामदेव मिसाळ यानी माहिती-मागणीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्याने त्याना रूपये २५००० शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी श्री.सोपान नामदेव मिसाळ यांच्या जून २०११, जुलै २०११, ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या मे २०११, जून २०११, जुलै २०११ व ऑगस्ट २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, ग्रामीण विभाग, सोलापूर यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. केशव शरणप्पा इंगळे
व्दारा सर्वोदय हौसिंग सोसायटी, विजापूर रोड,
इंदिरानगर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था सोलापूर, सोलापूर शहर, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,
सर्वोदय सहकारी गृहनिर्माण संस्था सोलापूर,
सोलापूर शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२७/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. केशव शरणप्पा इंगळे
व्दारा सर्वोदय हौसिंग सोसायटी, विजापूर रोड, इंदिरानगर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था सोलापूर, सोलापूर शहर, सोलापूर यांचे प्रतिनिधी
श्री. आर. आर. ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,

| | |
|---|---|
| | सर्वोदय सहकारी गृहनिर्माण संस्था सोलापूर,<br>सोलापूर शहर, सोलापूर श्री. आण्णासाहेब तुकाराम खंदारे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सर्वोदय सहकारी गृहनिर्माण संस्था, सोलापूर या संस्थेबाबत १५ मुद्दयांची माहिती मागितली होती. मुद्दा क्र. ५, ७, १० व १४ यांची माहिती मिळाली नाही. ही मागासवर्गीयांची गृहनिर्माण संस्था असून सरकारने १९७२ साली मोफत जागा व अनुदानही दिले आहे. मूळ सभासदांपेक्षा काही वेगळ्या व्यक्तींना भूखंड दिले आहेत. अनेक अनियमितता आहेत. कागदपत्रांच्या प्रतींसह सर्व माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी- श्री. इंगळे यांच्या दि. १८.१२.२००८ च्या पत्राला दि. ८.१.२००९ रोजी उत्तर पाठवून उपलब्ध माहिती दिली व कागदपत्रांच्या प्रतींसाठी शुल्क कळविले. दि. २१.१.२००९ ला शुल्क प्राप्त झाल्यानंतर दि. २४.१.२००९ रोजी प्रती दिल्या. संस्थेवर सध्या प्रशासक आहेत.

प्रशासक -श्री. इंगळे याना हवी असलेली कोणतीही माहिती कागदपत्रानुसार ८ दिवसांत देता येईल.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी - योग्य माहिती देत नसल्यामुळे संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अपीलकर्त्यांना अपेक्षित असलेले खुलासे व सभासदांच्या संदर्भातील माहिती तयार करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आवश्यक असल्यास त्यानी अभिलेखांचे अवलोकन करावे व हव्या असलेल्या प्रतींची लेखी मागणी करावी. जन माहिती अधिकारी/प्रशासक यानी अपीलकर्त्यास अभिलेखांचे अवलोकन करु देऊन त्यांच्या लेखी मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल राजाराम भोसले
मु. पो. पांडे, ता. करमाळा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री. शिपलागिरीजी महाराज प्राथमिक आश्रमशाळा देवांग (वा),
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुनिल राजाराम भोसले
मु. पो. पांडे, ता. करमाळा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर श्री. रामचंद्र विठ्ठल सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री. शिपलागिरीजी महाराज प्राथमिक आश्रमशाळा देवांग (वा),

| | |
|---|---|
| | ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. नामदेव जगन्नाथ यादव |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री शिपलागिरीजी महाराज प्राथमिक आश्रमशाळा, देवांग (वा), ता. मोहोळ, जि. सोलापूर या शाळेकडे मागितलेली माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही. शुल्क भरण्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी म्हणत असले, तरी तसे पत्र मिळाले नाही.

जन माहिती अधिकारी- श्री. भोसले यांच्या दि. ३.३.२०१० च्या अर्जाला दि. २९.३.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. त्यानी शुल्क भरले नाही, म्हणून माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. ते टपाल त्यानी न स्वीकारल्यामुळे तसा शेरा मारुन परत आले.

जन माहिती अधिकारी यानी माहितीच्या प्रतींसह पूरक कागदपत्रे सादर केली.

अपिलीय प्राधिकारी - विहित मुदतीत माहिती न दिल्याची तक्रार अपीलकर्ता यानी केली. त्यामुळे माहिती त्वरित देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी याना पत्राव्दारे दिले. त्यानुसार त्यानी माहिती पाठविली. अपीलकर्त्यांनी टपाल स्वीकारले नाही, असे कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास दि. २९.३.२०१० रोजी पत्र पाठविल्याची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत जन माहिती अधिकारी यानी

आयोगाला सादर करावी. तसेच अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास शुल्क भरुन घेऊन माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री शिपलागिरीजी महाराज प्राथमिक आश्रमशाळा देवांग (वा), ता. मोहोळ, जि. सोलापूर

श्री. नामदेव जगन्नाथ यादव यानी दि. १०/१७.१.२०११ च्या पत्रान्वये जावक बारनिशीतील नोंदीची प्रत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.कबीर रुबाब शेख **अपीलकर्ता**
रा.आकुलगांव, ता.माढा,
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था माढा, जि.सोलापूर

**२.जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन/सचिव,
संत रोहिदास ग्रामीण सहकारी पतसंस्था बारलोणी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर
यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.बी.माने, सहाय्यक निबंधक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

संत रोहिदास ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्था मर्यादित, बारलोणी या पतसंस्थेच्या संदर्भातील ऑगस्ट २००४ ते ऑक्टो २००८ या कालावधीतील दोन सभासदांच्या कर्जाविषयीची माहिती अपीलकर्ता ॲड.कबीर रुबाब शेख यानी मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चेअरमन/सचिव, संत रोहिदास ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्था मर्यादित, बारलोणी यानी माहिती संस्था स्तरावरील असल्याने अर्ज वर्ग केले. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर याच्या निर्णयानंतरही संस्थेने माहिती पुरविली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी सहाय्यक निबंधक श्री.व्ही.बी.माने यानी केले.

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. तसेच अपीलकर्त्यानी त्रयस्थ व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांबाबतचा तपशील मागितला आहे तो देता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश आर.हारकूड **अपीलकर्ता**
मे.जनता इलेक्ट्रीक कंपनी,
श्री लक्ष्मी भाजी मंडई जवळ,
मेन रोड, अक्कलकोट-४१३ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
अक्कलकोट नगरपरिषद,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी,
अक्कलकोट नगरपरिषद,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४४/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.रमेश आर.हारकूड
मे.जनता इलेक्ट्रीक कंपनी,
श्री लक्ष्मी भाजी मंडई जवळ,
मेन रोड, अक्कलकोट-४१३ २१६

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी,
अक्कलकोट नगरपरिषद,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.सी.के.पटनम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश आर.हारकूड यानी केली. परंतु अपीलकर्त्याची मुख्य मागणी देयकांच्या संदर्भातील होती. नगरपालिकेकडे जमा असलेले बयाणा व अनामत रक्कम देण्याची त्याची मागणी होती. त्यानुसार रक्कम देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.सी.के.पटनम यानी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी पूर्तता केली आहे. तसेच कारणे स्पष्टीकरण, खुलासा यास्वरुपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल माधव पंडित
सर्व्हे नं. १०५/३/१, संतनगर, अपीलकर्ता
मरीया उद्यानाजवळ, लोहगांव, पुणे ४११ ०४७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुनिल माधव पंडित
सर्व्हे नं. १०५/३/१, संतनगर,
मरीया उद्यानाजवळ, लोहगांव, पुणे ४११ ०४७

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे श्री. न. म. गोटे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,

| | |
|---|---|
| | येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे श्री. पी.बी.चव्हाण<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. एस.के.आढाव |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि. २७.७.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता अनुपस्थित होते. सुनावणीची सूचना न मिळाल्याचे त्यानी कळविल्यामुळे दि. २६/१०/२०१० रोजी फेरसुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जन माहिती अधिकारी यानी माहिती विलंबाने व अपुरी दिली. मुद्दा क्र. २,४,५, ६ व ७ यातील काही माहिती मिळाली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी- अपीलकर्ता श्री. सुनिल माधव पंडित यांच्या दि. ३.१२.२००९ च्या अर्जावर दि.२९.१२.२००९ रोजी उत्तर पाठविले. वेगवेगळया विषयांची व अनेक मुद्दयांची माहिती एकाच अर्जात मागितली असल्यामुळे आमच्याकडील अत्यावश्यक माहितीबाबत कळविल्यास विहित मुदतीत माहिती देता येईल, असे कळविले. मुद्रणालयात कर्मचा-यांचे दोन गट कार्यरत असून पोलिसांकडे तक्रारीही झाल्या आहेत. या गटांमधील वादाच्या पार्श्वभूमिवर सातत्याने दोन्ही बाजूंनी अर्ज येत असतात. तरीही त्या त्या वेळी माहिती दिली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित नव्हते. दि.२७.७.२०१० च्या सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्त्याच्या अर्जातील मुद्दा क्र. १, ३, ८, व ९ मधील अतिरिक्त कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास त्वरित देण्यात आल्या.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २, ३, ४ , ५ व ६ ही माहिती त्रयस्थ पक्षाची व्यक्तिगत स्वरुपाची आहे. मुद्दा क्र. ६ व ७ मधील दोन कर्मचा-यांबाबतच्या तक्रारीवर केलेली कार्यवाही व चौकशी याची माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने

सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे श्री. न. म. गोटे यानी दि २८.१०.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभु बाजीराव खंडागळे
उपळाई रोड, देशमुख प्लॉट,
श्रीकृष्ण कॉलनी, डी-६६, **अपीलकर्ता**
बार्शी, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
बार्शी, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषि अधिकारी,
बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३७/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.प्रभु बाजीराव खंडागळे
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, श्रीकृष्ण कॉलनी, डी-६६,
बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
बार्शी, जि.सोलापूर श्री.विठ्ठल नागनाथ भुजबळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२३.०२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता,जन माहिती अधिकारी व यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

**<u>अपीलकर्ता</u> :-** सन १९९४-९५ मधील सिमेंट नाला बंडीगच्या कामांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषि अधिकारी, बार्शी, जि.सोलापूर यानी आधी चुकीची माहिती दिली. खऱ्या कॅश बुकाची प्रत विलंबाने व अपुऱ्या स्थितीत नंतर दिली. दि.१.४.१९९५ ते १५.४.१९९५ या कालावधीची कॅश बुकाची प्रत अद्याप मिळाली नाही. त्यामुळे माझ्याकडून वसूल केलेली रक्कम परत मिळालेली नाही.

**<u>जन माहिती अधिकारी</u> :-** अपीलकर्ता सातत्याने याच विषयासंदर्भात अर्ज /अपिले व पत्रव्यवहार करीत आलेले आहेत. वेळोवेळी त्याना माहिती दिलेली आहे. ते कृषि सहाय्यक पदी आसतानाच्या काळातील सिमेंट प्रकरणाबाबतची चौकशी अद्याप चालू आहे. संबंधित रक्कम बँकेत जमा असून चौकशीचा निकाल लागल्यानंतर रक्कम देण्या- न देण्याबाबतचा निर्णय होईल व त्यानुसार कार्यवाही केली जाईल. याच विषयाबाबतचे अपीलकर्त्याचे अपील क्र.२३३/सोलापूर आयोगाने यापूर्वी निकाली काढलेले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याला वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे व तशी पोहोच अपीलकर्त्याने दिली असल्याचे दिसून येते. रक्कमवसुलीबाबतची तक्रार/मागणी हा माहितीचा अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रंगनाथ अण्णाराव पाटील
मु.पो.आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
पुणे विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री.रंगनाथ अण्णाराव पाटील<br>मु.पो.आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर,<br>जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.राजकुमार रंगनाथ पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता,जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.०२.२०११ रोजी घेण्यात आली.

विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील अर्ज व त्यावरील कार्यवाही याबाबतची जुलै २००६ ते २००८ या काळातील माहिती मागितली होती. तसेच आपल्या अर्जावरील जात पडताळणीची कार्यवाही कुठपर्यंत आली आहे. याची विचारणा केली होती. परंतु माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रंगनाथ अण्णाराव पाटील यांचे प्रतिनिधी श्री.राजकुमार रंगनाथ पाटील यानी केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तीन वर्षांच्या काळातील विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन देण्याची,तसेच स्वतःच्या जात पडताळणी अर्जावर कार्यवाही करण्याची अपीलकर्त्याची मागणी आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. त्यांच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,पुणे विभाग, पुणे यानी देणे योग्य ठरेल

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद विष्णुपंत महाडिक
४५५२/२, महाडिक बंगला,
जुना कराड नाका, पंढरपूर, अपीलकर्ता
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
भीमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, टाकळी सिकंदर,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०१/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विनोद विष्णुपंत महाडिक
४५५२/२, महाडिक बंगला, जुना कराड नाका, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. डी. आर. घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
भीमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, टाकळी सिकंदर,
ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. एन. एम. यादव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - भीमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर या साखर कारखान्याचे सन २०००-२००८ या कालावधीतील संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडून ऊस बेण्यांच्या अग्रीम रकमेची वसुली व वैद्यकीय खर्चाची माहिती मागितली होती. ती अपुरी दिली.

जन माहिती अधिकारी- श्री. महाडिक याना आठ वर्षाच्या काळातील विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन हवी होती, ती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. डी.आर.घोडे यांच्या आदेशानुसार आणखी काही माहिती व शंकांबाबतची उत्तरेही दिली. शंका असल्यास सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, भीमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. एन. एम. यादव यानी काही माहितीसह उत्तर दिले आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.फक्रोद्दिन हसन डोंगरी
मेहबूबनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.फक्रोद्दिन हसन डोंगरी
मेहबूबनगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.व्ही.बी.माने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.बी.एस.कटकदौंड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री सिध्दिविनायक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या पतसंस्थेबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केली नाही व उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीची माहितीही जन माहिती अधिकारी यानी दिली नाही.

जन माहिती अधिकारी - याच कार्यवाहीच्या अनुषंगाने माहिती मागणारे ६ अर्ज अपीलकर्ता यानी दि.१२.१.२००९ व दि.१५.१.२००९ रोजी पाठविले. त्याना विहित मुदतीत उत्तर देऊन ४ अर्जांची माहिती समक्ष दिली व दोन अर्जांची माहिती त्यानी समक्ष स्वीकारली नाही, म्हणून टपालाने पाठविली. त्यांची मागणी कार्यवाहीची असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.बी.एस.कटकदौंड यानी आपल्या प्रतिपादनाचया पुष्ठ्यर्थ पूरक कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या. ही कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती अनेकदा देण्यात आली आहे. तथापि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपीलकर्त्यानी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मोहोळ यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतचा तपशील जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी पुन्हा एकत्रित स्वरूपात तीन दिवसांत अपीलकर्त्यास पुरवावा, असे मौखिक ओदश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती

अधिकारी यानी दि.२५.२.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास संबंधित प्रकरणातील तपशील कळविल्याचे या पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल नारायण मोरे
मु.पो.डोंगरगाव, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनिल नारायण मोरे
मु.पो.डोंगरगाव, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.ज्ञानेश्वर औदुंबर साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर
विद्यमान-अशोक शिवाजी पाटील, तत्कालीन-श्री.सादिक साहेबहुसेनी वळसंगकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री.सादिक हुसेन वळसंगकर ग्रामसेवक असताना दि.१६.७.२००८ रोजी अर्ज करुन ग्रामपंचायतीच्या प्रोत्साहनात्मक निधीच्या खर्चाची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती जी कॅश बुकमध्ये होती त्याच्या प्रती दिल्या. आधीचे ग्रामसेवक श्री.वळसंगकर यानी दप्तरी पदभार पूर्ण न दिल्यामुळे सर्व माहिती वेळेत देता आली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता श्री.अनिल नारायण मोरे हे ग्रामपंचायत सदस्य असून माझ्याविरुध्द सातत्याने तक्रारी करीत असतात. त्यांचा अर्ज आला, तेव्हा मी कामावर नव्हतो व दि.१८.८.२००८ रोजी माझी बदली झाली. दि.२१.९.२००८ रोजी सर्व पदभार मी विद्यमान ग्रमासेवक श्री.अशोक शिवाजी पाटील यांच्याकडे सोपविला. विलंबाला मी जबाबदार नाही.

अपिलीय प्राधिकारी - श्री.मोरे यानी मागितलेल्या माहितीचे दप्तर पूर्ण करण्यासाठी श्री.वळसंगकर यानी घेतले होते. घरपट्टी, पाणीपट्टी याच्या पावत्या न देणे यासारख्या बाबींमुळे श्री.वळसंगकर यांची खातेनिहाय चौकशी होऊन जून २०१० मध्ये पाच वेतनवाढी रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे. तसेच ग्रामनिधीमधून झालेल्या कामांची चौकशी चालू आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता विद्यामन ग्रामसेवक व तत्कालीन ग्रामसेवक परस्परावंर आरोप करत असून त्याची शहानिशा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत शक्य नाही. तसेच दप्तर योग्य प्रकारे न ठेवण्याचया अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यांच्यावर कारवाई झाली असून चौकशीही चालू असल्याचे दिसते. संपूर्ण दप्तर आता विद्यमान ग्रामसेवकाच्या ताब्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरुन दिसते. या स्थितीत अपीलकर्त्यास

सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करू देऊन हवी असलेली माहिती निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मौलासाब जमालसाब सगरी
८५/४, रविवार पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग,
सेनापती बापट रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे वनविभाग,
सेनापती बापट रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मौलासाब जमालसाब सगरी यानी आरा गिरण्यांची दि.८.१२.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे वनविभाग, सेनापती बापट रोड, पुणे यानी दि.५.३.२००८ च्या पत्रान्वये दिल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते.

दि.१४.७.२०१० व दि.१२.११.२०१० रोजी सुनावणी ठेवली असता अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. अनुपस्थितीबाबत, तसेच मागणीविषयी अपीलकर्त्याने कोणतेही लेखी निवेदनही सादर केलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहन खंडेराव गायकवाड
ब्लॉक नं.११३, विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था,
म.भगतसिंग मार्केट चौक, उत्तर सदर बझार, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, शहर सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.मोहन खंडेराव गायकवाड<br>ब्लॉक नं.११३, विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था,<br>म.भगतसिंग मार्केट चौक, उत्तर सदर बझार, जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर श्री.एस.एस.राऊत | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था, सोलापूर या संस्थेच्या गैरकारभाराबाबत कार्यवाही करण्याविषयीच्या मागणीबाबतची माहिती मागितली होती. संस्थेच्या कार्यकारिणीवर

समाविष्ट केलेली बेकायदेशीर नावे चौकशी करुन कमी करावीत व दोन संचालकांना बेकायदेशीरपणे पदावरुन कमी केले, त्याबाबात चौकशी व कार्यवाही करुन अहवाल मिळावा, अशी मागणी होती.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्याच्या तक्रारीबाबत संस्थेकडून अहवाल मागविला संस्थेने दिलेला खुलासा अपीलकर्त्यास दिला. तक्रारींची चौकशी करुन अहवाल देण्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतची प्रक्रियाही सुरु आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. हे पत्र न मिळाल्याचे अपीलकर्ता यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितल्यामुळे त्याची प्रत दिली.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे.

माहिती-मागणी अर्जावर तत्परतेने व सकारात्मक पध्दतीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर श्री.सुनिल शिरापूरकर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० एप्रिल २०११**